# राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५८१/२००७.

श्री. सुरेंद्रकुमार ताराचंद सोनवाने,
बब्बा भवन, बिल्डींग जवळ,
श्रीनगर, गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. चंद्रकांत इंगळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (सा.प्र.वि.),
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. एस. आर. खोत,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, (सा.प्र.वि.),
जिल्हा परिषद, गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००७ रोजी माहिती अधिकारी जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. परिचर भरतीबाबत ११ जून २००६ ते २९.८.२००७ पर्यंत १) परिचर पदावर नियुक्त झाले त्यांचे अर्जाचा नमुना, नोंदणी रजिष्टर वरुन उत्तर पत्रिकांची व इत्यादी दस्तावेजची पाहणी. २) आपण मुख्य कार्यपालन अधिकारी साहेबांना पेटयांचे सिल तोडण्याचे परवानगी मागितल्याचे व मुख्य कार्यपालन अधिकारी साहेबांनी पेटयांचे सिल तोडण्याची परवानगी दिल्याचे दस्तावेज. ३) प्रश्न-उत्तरपत्रिका किती छापण्यात आल्या याची माहिती. ४) आम्हाला माहिती न करता पेटयांचे सिल कां

... २

तोडण्यात आले. सदरची माहिती शिघ्र पोष्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २८.९.२००८ रोजी आपण विचारणा केल्यानुसार माहितीची पाहणी करण्याकरिता आपण दिनांक १.१०.२००७ ला या कार्यालयास दुपारी १२:०० न चुकता उपस्थित रहावे. असे माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. परंतु तत्पूर्वीच अपीलकर्ता यांनी त्याच दिवशी दिनांक २८.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला नाही असे विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक २८.९.२००७ रोजी ३० दिवसाचे मुदत संपल्याचे दिवशी नंतर दुसऱ्या दिवशी त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्यामुळे दिनांक २८.९.२००७ रोजी जे पत्र अपीलकर्ता यांना दिलेले आहे ते ३० दिवसाचे मुदतीनंतर दिलेले आहे असे आढळून येते. जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचे पत्र हे विलंबाने कां दिले असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की, दिनांक २९.८.२००८ रोजीचा अर्ज त्यांना दिनांक ३.९.२००७ रोजी आला. परंतु जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज हा कोणत्या तारखेला आला हे महत्वाचे नाही. सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या दिवशी अर्ज दिला जातो त्या दिवसा पासून ३० दिवसाचे मुदत परिगणना केली जाते असे असले तरी जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे लिपिक श्री. डी. एन. गोधे, वरिष्ठ सहाय्यक यांचेकडे असल्याने त्यांना दिनांक ३.९.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता पत्र दिले होते. परंतु त्यांनी ही माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याचा अर्थ जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता लिपिकाचे सहाय्य घेण्यात आले असल्याने अधिनियमाचे कलम ५(५)(४) प्रमाणे ज्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांचे सहाय्य घेण्यात आले असेल त्यांना सुध्दा माहिती अधिकारी समजण्यात येते व सदरच्या प्रकरणामध्ये श्री. डी. एन. गोधे, वरिष्ठ सहाय्यक यांचे सहाय्य घेतले असल्यामुळे व त्यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता ते दोषी आढळून येतात व अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे ते शास्तीस पात्र राहतात. तसेच अपीलकर्ता यांनी दिनांक २८.९.२००७ रोजी विलंबाने जरी माहिती पाहण्यास कळविण्यात आले होते तरी अपीलकर्ता यांना

माहिती पाहिजे आहे असे समजून माहिती पाहण्यास उपस्थित राहणे आवश्यक होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२००७ रोजी तसेच दिनांक २८.९.२००७ रोजी पत्र दिलेले दिसून येते. परंतु ते आवक लिपिक यांना दिलेले आहे. याचा अर्थ आवक लिपिक हे माहितीचे लिपिक आहे. त्यामुळे ते लिपिक जबाबदार आहेत असे दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी वेळोवेळी पत्र दिलेले दिसून येते दिनांक ४.९.२००७, दिनांक १४.९.२००७, दिनांक १९.९.२००७, दिनांक २७.९.२००७ व दिनांक २८.९.२००७ रोजी सुध्दा पत्र दिलेले दिसून येते व त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योग्य ती चौकशी करुन त्यांनी संपूर्ण प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी सदरच्या परीक्षेच्या प्रकरणामध्ये संपूर्ण चौकशी करावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.८.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने ३० दिवसानंतर माहिती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिले असल्यामुळे ते विलंबाने दिलेले आहे व त्यास श्री. डी.एन.गोधे, वरिष्ठ सहाय्यक हे जबाबदार दिसून येतात. त्याबाबतची चौकशी करुन संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

३) अपीलकर्ता यांनी दिनांक २८.९.२००७ रोजी सुध्दा सामान्य प्रशासन विभाग यांचे जावक लिपिकांकडे पत्र सुध्दा केली असल्यामुळे व त्या पत्राची सुध्दा दखल घेतली नसल्यामुळे त्याबाबतची संपूर्ण चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

४) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी. या वरील संपूर्ण कार्यवाहीचा अहवाल आयोगाकडे ३ महिन्याचे आंत सादर करावा.

५) अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००७ रोजी ज्या अर्जामध्ये जी माहिती पाहणी करण्याकरिता मागणी केलेली आहे ती संपूर्ण कागदपत्रे मुद्येनिहाय त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून सदरच्या माहितीचे संदर्भातील कागदपत्राची पाहणी करावी व तसे लेखी जनमाहिती अधिकारी यांना द्यावे.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- २.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/११२१-११२३/२.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५९१/२००७.

श्री. उमाशंकर प्र. नामदेव,
७, कमल केशव प्लाजा,
सेंट्रल बाजार रोड,
रामदासपेठ, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त,
परिमंडळ - १, सिताबर्डी,
नागपूर.

श्री. एम. एम. वाढवे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
सिताबर्डी विभाग,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एच. आर. मडावी, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक २५.६.२००७ गैरअर्जदार व अर्जदार यांच्या बयानाची, पोलीस स्टेशन डायरीची व एफ.आय.आर. ची प्रमाणित प्रत देण्यात

... २

यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.८.२००७ रोजी पत्र देऊन रुपये ४४/- चा भरणा करुन माहिती घेऊन जावी असे कळविण्यात आलेले होते. परंतु अर्जदाराचा अर्जातील पत्ता अपूर्ण असल्यामुळे पत्र तामील होऊ शकले नाही व दिनांक ८.९.२००७ रोजी पत्र परत आले. दिनांक २२.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले होते व त्यानंतर दिनांक ४.१०.२००७ रोजी माहिती घेऊन जाण्याबाबतचे पत्र तामील झाले व त्यानंतर अर्जदार यांना वारंवार फोन केला असता माहिती घेण्यास येतो असे सांगितले. तसेच दिनांक ६.१०.२००७ रोजी पोलीस हेड कॉ. विनोद वांदे ब.नं. ३२४१ यांनी मोबाईल वरुन अर्जदार हयांचे सोबत फोनवर संपर्क केला. परंतु अर्जदार अद्यापपर्यंत माहिती घेण्यास आले नाही म्हणून भारतीय डाक विभाग, स्पीड पोष्ट क्र. इएम/१९६६७५९८१/एन, दिनांक १४.११.२००७ अन्वये माहिती पाठविण्यात आली आहे. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २७.११.२००७ रोजी दिलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आले आहे. तसेच आज अपीलकर्ता गैरहजर आहेत. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असे दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ३.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११२४-११२५/३.२.२००९

## राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६००/२००७.

श्री. दत्तु शंकर चिकाटे,
मु. पो. आल्लापल्ली,
एटापल्ली रोड, सोसायटी गोडाऊनचा समोर,
ता. अहेरी, जि. गडचिरोली - ४४२ ७०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र कुलगुरु,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

श्री. डॉ. देवेंद्रनाथ मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा
परीक्षा नियंत्रक,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. Winter - २००६ ला मी M.A.-I(History) ची परीक्षा दिली होती त्या परीक्षेच्या मी सोडविलेल्या उत्तर पत्रिकेच्या झेरॉक्स प्रत (४ ही विषयाच्या) मिळण्याबाबत.

... २

Roll No. १३२३४४, EnRoll No. EXT/W २०००/M.A./६१६८. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.६.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी निर्देश क्रमांक ५/२००४ मधील तरतुदीनुसार फक्त दोन उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती देता येतात. परंतु यासाठी रितसर आवेदन पत्र संबंधित महाविद्यालयामार्फत (निर्धारीत शुल्कासहीत) निकाल जाहीर झाल्यापासून गुणपत्रिके वरील दिनांकापासून १२ दिवसाच्या आंत विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे. त्यामुळे आपण अर्जात नमुद केल्यानुसार उत्तरपत्रिकेच्या छायांकीत प्रती नियमानुसार देणे शक्य नाही. त्याचप्रमाणे परिक्षकांची नांवे देण्यासंबंधी मागितलेली माहिती गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे तीही देता येणार नाही. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.७.२००७ रोजी देण्यात आला असून प्र-कुलगुरु व अपीलीय अधिकारी यांनी संबंधितांना कळविण्याबाबत दिलेल्या आदेशानुसार केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त अपीलांवर अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २५.७.२००७ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयामध्ये जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय हा कायम ठेवण्यात आला आहे व अपील हे खारीज करण्यात आले आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रमाणे माहिती अधिकारात उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मागितलेली आहे. मात्र विद्यापीठ अध्यादेशाप्रमाणे परीक्षेचा निकाल झाल्यानंतर १२ दिवसांचे आंत विद्यार्थ्यांने उत्तरपत्रिकेची छायांकित प्रतीसाठी किंवा फेर तपासणीसाठी अर्ज करणे आवश्यक असते अशा प्रकारचा अध्यादेश हा सार्वजनिक प्राधिकरणाचा शिस्तीकरिता असतो त्या उपक्रमाच्या योग्य त्या व्यवस्थापनाचेकरिता असतो व त्याआधी सदरचा नियम पाळणे आवश्यक आहे. कारण उत्तरपत्रिकेची प्रती सुध्दा किती काळ जतन करावयाचा याबाबतचा सुध्दा नियम आहे व त्यादृष्टीने पुढील सत्राचे संदर्भात विद्यार्थ्यांस परीक्षा सुलभ व्हावी यासाठी कालमर्यादा असते व ते कालमर्यादा पालन करणे अर्जदारास आवश्यक आहे. त्यात अर्जादाराचा विचार करुन अशा प्रकारचा अध्यादेश किंवा नियम केलेले

असतात. माहितीच्या अधिकारामध्ये ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध होते त्याचा अर्थ १२ दिवसाचे नंतर माहिती उपलब्ध झाली तर पुढील परिक्षेचा किंवा सत्राचा लाभ होईलच असे नाही. त्यात विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता असते महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम ४(ए) प्रमाणे एखादे विभागाने दस्तऐवजाची पूर्वीची जी किंमत ठेवली आहे तर ती किंमत देणे अपेक्षित आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना जे उत्तर दिलेले आहे व तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या अर्जाचे संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११२६-११२८/३.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५९६/२००७ व अपील क्रमांक २५९७/२००७.**

श्री. मारोतराव विश्वनाथ मोते,
प्लॉट नं. २१, महालक्ष्मी नगर नं. १,
मानेवाडा रोड, नागपूर- ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त, (मुख्यालय)
नागपूर शहर, नागपूर.

श्री. वामन खरात,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन)
नागपूर शहर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक २३.११.२००७ व दिनांक २६.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ३.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. परंतु अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक २५९६/२००७ मध्ये आयोगास अशी विनंती केली की, सध्या मी सेवानिवृत्त झालो आहे व वरील अपील हे माझ्या बदली बाबतच्या माहितीचे संदर्भात होते त्यामुळे आता त्याची आवश्यकता नसल्याने मी माझे अपील मागे घेत आहो असे लेखी लिहून दिले आहे. तसेच अपील क्रमांक २५९७/२००७ मध्ये सुध्दा वरील अपील ज्या माहितीच्या संदर्भात होते. ती माहिती मला नंतर पुरविण्यात आल्याने मी वरील अपील मागे घेत आहो असे लेखी लिहून दिले असल्यामुळे सदरचे दोन्ही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ३.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११२९/३.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६०२/२००७.

श्री. किसन रामचंद्र निखारे,
टिमकी, चिमाबाई पेठ, मातामंदीर जवळ,
नागपूर - ४४० ०१८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
धनवटे चेंबर, सिताबर्डी, नागपूर.

श्री. सुर्वे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपनिबंधक, सहकारी संस्था,
नागपूर शहर - २,
सहकार सदन, अमरावती रोड,
नागपूर.

श्री. किसन रामचंद्र निखारे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, दि.एम्प्रेस मिल्स कर्मचारी सह.संस्था,
३०५-३०६, गोदावरी अर्पाटमेंट, श्रीनगर,
रिंगरोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. विद्यमान सचिव तथा माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००७ रोजी तत्कालीन माहिती अधिकारी तथा सचिव, दि.एम्प्रेस मिल्स कर्मचारी सह. संस्था मर्या. नागपूर यांचेकडे संस्थेच्या मालकीचे बहादुरा-ले-आऊट मधील संपूर्ण प्लॉट

... २

धारकाचे नांव व पत्त्यासह यादी अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच दिनांक १२.८.२००६ व दिनांक २३.७.२००७ च्या आमसभेच्या ठरावाची प्रोसींडिंग बुक मध्ये केलेल्या नोंदी व सन २००५-२००६ व २००६-२००७ मध्ये झालेल्या ऑडीट रिपोर्टची प्रत मिळणेबाबत. सदरची माहिती टपालद्वारे घेणार असे नमुद करुन माहिती मागितली होती. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २८.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांना विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सिताबर्डी, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १९.१०.२००७ रोजी निर्णय देण्यात आला असून मागितलेली माहिती तातडीने देण्यात यावी असा आदेश देण्यात आलेला दिसून येतो. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णयानुसार सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००७ रोजी आयोगाचे कार्यालयास जनमाहिती अधिकारी तथा सचिव हे निवडणूक होऊन निवडून आले आहेत असे कळविलेले आहे व नवीन निवडूण आलेले सचिव हे अर्जदार व अपीलकर्ता आहेत. त्यांनी मागितलेली माहिती ही आज सचिव म्हणून त्यांचे कार्यालयात उपलब्ध आहे. परंतु त्यांनी दिनांक २१.८.२००७ रोजी माहिती मागण्याचा अर्ज केला होता व तत्कालीन माहिती अधिकारी यांना त्यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमांचे तरतुदी प्रमाणे कार्यवाही करावी अशी त्यांनी आयोगापुढे विनंती केलेली आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा याचिका क्रमांक ५६६६/२००७ सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी श्री. गजानन वानखेडे विरुध्द डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक, अमरावती या अपीलाचे संदर्भात दिला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा सहकारी संस्था यांना लागू होत नसल्याचा निर्णय हा श्री. गजानन वानखेडे विरुध्द डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी संस्था या अपीलात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये निर्णय दिला असल्याने सदरचे अपील खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११३०-११३२/४.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६०३/२००७.

श्री. रामचंद्र बळीरामजी कडवेकर,
अयोध्यानगर, प्लॉट नं. ७३,
राममंदीर समोर,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुर्वे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था,
नागपूर शहर - २,
सहकार सदन, अमरावती रोड,
नागपूर.

श्री. किसन रामचंद्र निखारे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, दि.एम्प्रेस मिल्स कर्मचारी सह.संस्था,
३०५-३०६, गोदावरी अर्पाटमेंट, श्रीनगर,
रिंगरोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. विद्यमान सचिव तथा माहिती अधिकारी हे निवडून आल्यामुळे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून दि.एम्प्रेस मिल्स कर्मचारी सह. संस्था मर्या. नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) बहादूरा मधील प्लॉट धारक यांची पूर्ण यादी. २) २००४ ते आजपावेतो आवक जावकची सविस्तर माहिती ७ दिवसाच्या आंत लेखी

... २

प्रत द्यावी. संस्थेकडून झालेल्या आर्थिक देवाण घेवाण सविस्तर लेखी प्रत द्यावी. यापूर्वी दिनांक १०.७.२००७ ला संबंधित पत्र दिले आहे त्याचे उत्तर आजपावेतो मिळाले नाही. तरी माहितीचा अधिकार, २००५ अधिनियमानुसार त्वरित द्यावी न दिल्यास पुढील कारवाई संबंधीत कार्यालयाशी संपर्क करुन द्यावी. सदरची माहिती प्रत्यक्ष द्यावी असे नमुद केलेले आहे. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ५.११.२००७ रोजी देण्यात आला असून तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश देण्यात आलेला दिसून येतो व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्यात आलेले दिसून येते.

३. तत्कालीन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र डॉ.पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लिमिटेड या संस्थेने मा.उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये श्री. गजानन वानखेडे यांच्या अपीलात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा सहकारी संस्थांना लागू होत नसल्याचा निर्णय दिला असल्याने पतसंस्था ही सहकारी संस्था असल्याने सदरचा निर्णय हा पतसंस्थेस सुध्दा लागू होत असल्याने सदरचे अपील खारीज होणेस पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) सदरचे अपील खारीज करण्यांत येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११३३-११३४/४.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६०६/२००७.

श्री. बबन दगडुजी वाघ,
स्वाती बंगला, रामबाग फॉरेस्ट कॉलनी,
मुल रोड, चंद्रपूर - ४४२ ४०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
व्यवस्थापकीय संचालक,
फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड,
रॉवेल प्लॉझा, प्लॉट नं. १२, कडबी चौक, कामठी रोड,
नागपूर - ४४० ००४.

श्री. सर्जन भगत,
जनमाहिती अधिकारी तथा
महाव्यवस्थापक,
फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड,
रॉवेल प्लॉझा, प्लॉट नं. १२, कडबी चौक, कामठी रोड,
नागपूर - ४४० ००४. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. विजयकुमार सिन्हा, प्रादेशिक व्यवस्थापक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम.लि., नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. श्री. बी.डी.वाघ, विभागीय व्यवस्थापक, पश्चिम चांदा वन प्रकल्प विभाग, चंद्रपूर यांचे विरुध्द म.ना.से. अंतर्गत तयार करण्यात

... २

आलेले दोषारोप पत्र व त्याअनुषंगाने इतर माहिती. माहे एप्रिल, २००७ ते ऑगष्ट, २००७ या कालावधीत तयार केलेले दस्ताऐवज. १) माहे एप्रिल, २००७ मध्ये श्री.बी.डी.वाघ यांची बदली करण्याबाबत शासनास सादर केलेला प्रस्ताव व नस्तीवरील संबंधित अधिकाऱ्यांच्या टिपण्या. २) माहे मे, २००७ मध्ये श्री.बी.डी.वाघ यांच्या बदलीसाठी शासनास सादर केलेला अहवाल व त्यासंबंधी संबंधित अधिकाऱ्यांचे नस्तीवरील अभिप्राय. ३) श्री. बी.डी.वाघ यांचे विरुध्द म.ना.से. १९७९ नियमाअंतर्गत शासनास सादर केलेले प्रारुप, दोषारोपाच्या प्रती व त्या अनुषंगाने श्री. ए.के.जोशी, भा.व.से. जी.एम. यांनी सादर केलेला अहवाल दिनांक १६.८.२००७ ते दिनांक १८.८.२००७ चंद्रपूर दौऱ्यांच्या अनुषंगाने. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.९.२००७ रोजी माहिती अधिनियमाचे कलम ८(जे) अन्वये मागितलेली माहिती पुरविणे बंधनकारक नाही. सबब ही माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १५.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ५.११.२००७ रोजी व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लिमिटेड, नागपूर यांनी महाव्यवस्थापक, एफडीसीएम लिमिटेड, नागपूर यांचे निर्णयाशी आम्ही सहमत असून सदर अधिनियमाचा कलम ८(जे) व कलम ८(एच) नुसार सदर माहिती देता येत नाही. करिता आपली अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचे निर्णयाचे विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये "प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले कारण योग्य नसून ते नियमानुसार नाही. अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही प्रशासकीय स्वरुपाची असून ती फौजदारी स्वरुपाची नाही. प्रशासकीय स्वरुपाच्या कारवाईस चौकशी पुर्ण करुन नंतरच दोषारोपाचे प्रारुप तयार करुन मंजूरीसाठी पाठविलेले आहे. त्याची प्रत व तत्संबंधी इतर दस्ताऐवज माहिती अधिकारी यांचेकडे मागण्यात आले होती. परंतु त्यांनी ती माहिती न देता त्यामध्ये एक मुद्या अधिकचा नमुद करुन माहिती देण्याचे टाळले. माझे प्रथम अपील नाकारतांना अपीलीय अधिकाऱ्याने ८(एच) या नियमाचा सुध्दा संदर्भ देऊन अपील फेटाळले आहे. मी मागितलेली माहिती ही प्रशासकीय स्वरुपाची आहे. परंतु मी नाकारतांना अपीलीय अधिकाऱ्याने फौजदारी स्वरुपाची माहिती असल्याचे समजून ती नाकारत आहे ही बाब नियमबाहय आहे. तसेच मला देय असलेली

माहिती नियमानुसार न देता त्यामध्ये लागू नसलेले नियम नमुद करुन माहिती देण्याचे बाबत संबंधित अधिकारी टाळाटाळ करीत आहेत. माझे प्रथम अपील फेटाळण्यापूर्वी माझी बाजू मांडण्याची मला संधी दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्याने घेतलेला निर्णय हा एकतर्फी व नियमानुसार नसून यामध्ये नैसर्गिक न्यायदानाचे दृष्टिने माझेवर अन्याय झाला आहे" अशी विनंती आयोगाकडे केलेली आहे. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपीलकर्ता यांचे विरुध्द जो प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे तो प्रस्ताव हा प्राथमिक स्वरुपाचा आहे व तो मसुदा आहे. तो मसुदा मंजूरीसाठी पाठविण्यात आलेला आहे. सदरचा मसुदा आयोगाने अवलोकन केला असता सदरच्या मसुदामुध्ये अपीलकर्ता यांच्या संदर्भामध्ये शासनाचे मंजूरीकरिता संपूर्ण प्रकरण हे दिलेले आहे व त्यामध्ये विभागीय चौकशीकरिता ज्या ज्या आवश्यक बाबी असतात त्या आवश्यक बाबींचा मसुदा आहे व त्यामुळे सदरची प्रक्रिया ही सुरु असल्यामुळे व त्यास अंतीम स्वरुप मिळत नसल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक नाही हे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे. अधिनियमाचे कलम ८(१)(ज) प्रमाणे ज्यामुळे अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल अशी माहिती प्रकट करण्यास अपवाद आली आहे. प्रत्यक्ष नकार चौकशीमध्ये अपराध या शब्दाचा अर्थ शब्दशः घेण्याची आवश्यकता नाही. शासकीय अधिकाऱ्यांचे विभागीय चौकशी करावयाची असल्यास व त्या चौकशीच्या संदर्भामध्ये जर प्रक्रिया अपूर्ण असेल व त्या प्रक्रियेच्या संदर्भात सुध्दा माहिती ही कलम ८(१)(ज) समाविष्ट होते व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. आज ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाली नाही किंवा सदरचा प्रस्ताव शासनाकडून मान्य होऊन आलेला नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेणे आवश्यक असते व सुनावणी घेतल्यानंतरच कारणमिमांसा देणारे निर्णय देणे आवश्यक असते. तसे या प्रकरणात केलेले दिसून येते. यापुढे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुढे याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक १८.९.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६०७/२००७.

श्री. बबन दगडुजी वाघ,
स्वाती बंगला, रामबाग फॉरेस्ट कॉलनी,
मुल रोड, चंद्रपूर - ४४२ ४०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
व्यवस्थापकीय संचालक,
फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड,
रॉवेल प्लॉझा, प्लॉट नं. १२, कडबी चौक, कामठी रोड,
नागपूर - ४४० ००४.

श्री. एन. मोहन कर्नाट,
जनमाहिती अधिकारी तथा
महाव्यवस्थापक,
फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड,
उत्तर चंद्रपूर प्रदेश, मुल रोड, चंद्रपूर - ४४२ ४०१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. विजयकुमार सिन्हा, प्रादेशिक व्यवस्थापक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, उत्तर चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सन २००५-२००६ ते २००६-२००७ या वर्षात केलेलया अनिधिकृत खर्चाबाबत व निष्काळजीपणाबाबत. मे २००७ ते ऑगष्ट २००७ या

... २

कालावधीत तयार केलेले दोषारोप पत्र. श्री. बी.डी.वाघ, विभागीय व्यवस्थापक, पश्चिम चांदा वन प्रकल्प विभाग, चंद्रपूर यांचे विरुध्द विरुध्द एफ.डी.सी.एम.लि. च्या कामात निष्काळजीपणा करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे ३(i) चा भंग करणेबाबत तयार करण्यात आलेल्या दोषारोपांचा प्रारुप व मा.व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम.लि., नागपूर यांचे मंजूरीसाठी पाठविलेला प्रस्ताव त्याची प्रत. सदरची माहिती व्यक्तिशः देण्यात यावी असे नमुद केलेले आहे. अर्ज कार्यालयात दिनांक १४.९.२००७ रोजी प्राप्त झाला असून सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.१०.२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ८(एच) नुसार दोषारोपाच्या प्रती देता येत नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.११.२००७ रोजी देण्यात आला असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ८(एच) नुसार आपण मागितलेली माहिती देता येत नाही असे कळविले आहे. प्रादेशिक व्यवस्थापक, उत्तर चंद्रपूर प्रदेश यांचे निर्णयाशी आम्ही सहमत असून आपली अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. दिलेल्या निर्णयामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखाल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी "श्री. बी.डी.वाघ, विभागीय व्यवस्थापक, पश्चिम चांदा वन प्रकल्प विभाग, चंद्रपूर यांचे विरुध्द एफ.डि.सी.एम.लि.च्या कामात निष्काळजीपणा करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ चे ३(i) चा भंग करणेबाबत तयार करण्यात आलेल्या दोषारोपाचा प्रारुप व माननीय व्यवस्थापकीय संचालक, एफ.डि.सी.एम.लि. नागपूर यांचे मंजूरीसाठी पाठविलेला प्रस्ताव त्याची प्रत प्रथम अपीलीय अधिकारी मा.व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी माहिती अधिकाराच्या निर्णयावर सहमती दर्शविलेली आहे. सदर सहमती दर्शवितांना त्यांनी काही एक कारण नमुद केले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अर्जदारास अपील निकाली काढण्यापूर्वी बाजु मांडण्याची संधी दिली नाही. मागितलेली माहिती ही फौजदारी स्वरुपाची नसून ती प्रशासकीय स्वरुपाची आहे. अर्जदाराचे विरुध्द तयार करण्यात आलेले दोषारोप हे चौकशी अंती अंतीम करण्यात आलेले आहे व त्यानंतरच

दोषारोपाचा प्रारुप मंजूरीसाठी पाठविलेला आहे".  असे ही आयोगापुढे लेखी दिलेले आहे.

४.  त्यासंदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.  "माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय, जावक नोंदवहीचे पृष्ठाची छायांकित प्रत, चंद्रपूर येथील कार्यालयीन शिपाई यांचेकडे समक्ष निर्णयाची प्रत हस्तांतरीत केली, त्याबाबतच्या डाक बुकाची छायांकित प्रत.  माहिती नाकारण्यात येत असल्याबद्यल विहित मुदतीत अर्जदारास पत्र क्र. प्राव्यउचंप्र/आस्था/२०७५, दिनांक ३.१०.२००७ अन्वये कळविण्यात आले.  प्रथम अपील व्यवस्थापकीय संचालक, एफ.डि.सी.एम.लि. यांचे कार्यालयाकडून फेटाळण्यात आली.  पत्र क्र. प्रशा/आस्था/३५१२, दिनांक ५.११.२००७ श्री. बी. डी. वाघ, विभागीय व्यवस्थापक, पश्चिम चांदा यांचे विरुध्द सन २००६-२००७ या वर्षात क्षेत्रिय कामावर केलेल्या अनाधिकृत खर्चाबाबत व कामातील निष्काळजीपणा बाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये शिस्तभंग विषयक कारवाई करण्याकरिता दोषारोपाचा मसुदा व्यवस्थापकीय संचालक, नागपूर यांचे कार्यालयास सादर करण्यात आला होता.  श्री. बी. डी. वाघ हे वन विभागातून एफ.डि.सी.एम.लि.मध्ये परसेवेवर आले असल्याने व त्यांचेवर शिस्तभंग विषयक कार्यवाही शासन स्तरावर होत असल्याने व्यवस्थापकीय संचालक, नागपूर यांचे कार्यालया कडून दोषारोपाचे विवरणपत्र व ज्ञापनाचे प्रारुप शासनास सादर करण्यात आला.  शिस्तभंग विषयक कार्यवाही गोपनीय स्वरुपाची असून शासन स्तरावर याबाबत निर्णय घ्यावयाचा असल्याने शासन स्तरावरुन मान्यता (Approval) देण्याची कार्यवाही पुर्ण होण्याआधिच अशी माहिती अर्जदारास देता येणार नाही अशी या कार्यालयाची धारणा होती.  याकरिता या कार्यालयाचे पत्र क्र. प्राव्यउचंप्र/आस्था/२६३, दिनांक १८.९.२००७ अन्वये व्यवस्थापकीय संचालक, नागपूर यांना मार्गदर्शन मागितले होते.  याअनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक, नागपूर यांना त्यांचे पत्र क्र. प्रशा/आस्था/२८५३, दिनांक २५.९.२००७ अन्वये या कार्यालयाची धारणा कायम केली.  तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(एच) अन्वये दोषारोप प्रस्तावाच्या प्रती देणे बंधनकारक नाही असेही कळविले.  याशिवाय सदर प्रकरणात या कार्यालयाचे पत्र क्र. आस्था/२६०, दिनांक १७.९.२००७ अन्वये श्री. सुनिल हस्तक, वकील, चंद्रपूर यांचा विधी सल्लाही मागविण्यात आला होता.  श्री. सुनिल हस्तक,

वकील यांनी त्यांचे दिनांक १८.९.२००७ चे पत्रान्वये अधिनियमाच्या सेक्शन ८ सबसेक्शन I क्लाज H नुसार तसेच विभागीय चौकशी प्रत्यक्षात जेंव्हा सुरु होईल त्यावेळेस त्यांना दोषारोपाचे ज्ञापनाची प्रत देण्यात येतेच. त्यामुळे माहिती पुरविण्याचे नाकारण्यात यावे असा विधी सल्ला दिलेला आहे. व्यवस्थापकीय संचालक, नागपूर यांचेवर नमुद मार्गदर्शनानुसार व विधीसल्लानुसार तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील सेक्शन ८ सबसेक्शन I क्लाज H मधील तरतुदीनुसार अर्जदारास या कार्यालयाचे पत्र क्र. प्राव्यउचंप्र/आस्था/२०७५, दिनांक ३.१०.२००७ अन्वये माहिती देण्याचे नाकारण्यात आले".

५. जनमाहिती अधिकारी यांचे खुलाश्यावरुन असे दिसून येते की, सदरची कार्यवाही ही शिस्तभंग विषयक कार्यवाही असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही व त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांचेकडून तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून सदरच्या नस्तीचे अवलोकन आयोगाने केले. अवलोकन केलेली नस्ती विभागीय चौकशी सुरु करण्याच्याकरिता कारणे दाखवा नोटीस जी द्यावी लागते त्या नोटीसीची प्रक्रिया सदरच्या प्रस्तावात दिसून येते व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ८(एच) चा जो आधार घेतलेला आहे त्यामध्ये ज्यामुळे अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियामध्ये अडथळा येईल अशी माहिती प्रकट करण्यास अपवाद करण्यात आलेली असल्यामुळे त्याचा आधार घेतलेला दिसून येतो. सदरच्या प्रकरणात सुध्दा विभागीय चौकशीची प्रक्रिया सुरु आहे व त्यामुळे सदरचे दिलेले कारण हे योग्य आहे असे दिसून येते. कोणत्याही चौकशीमध्ये माहिती प्रकट केल्यास त्या चौकशीमधील तपासाच्या संदर्भामध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो. चौकशीमध्ये साक्षीदार असतात व दस्तऐवज पुरावा असतो. त्यामुळे सदरची माहिती अंतीम निर्णय होई पर्यंत किंवा दोषारोप पत्र सादर होई पर्यंत माहिती अधिकारी यांनी प्रकट करण्यास अपवाद करण्यात आला आहे त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी प्रथम अपीलात सुनावणी घेऊन कारणमिमांसा देणे आवश्यक आहे जेणे करुन अपीलकर्ता यांना त्यांची बाजू मांडता आली असती. व त्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन झाले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. यापुढे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही अपीलात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) प्रमाणे दोन्ही पक्षकारांच्या उपस्थित चौकशी करणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ५

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६१३/२००७ व अपील क्रमांक २६१४/२००७.

श्री. राजु किसनराव वानखेडे,
श्रीराम वार्ड, बल्लारपूर,
जि.चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सिडाम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर.

श्री. सुर्वे,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था,
धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
मध्यवर्ती इमारत, पुणे -१.

जनमाहिती अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था (पतसंस्था)
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
मध्यवर्ती इमारत, पुणे -१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००७ व दिनांक १७.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ५.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी व माहिती अधिकारी, पुणे यांचे वतीने श्री. सिडाम, विभागीय सहनिंबंधक सहकारी संस्था, नागपूर हे हजर आहेत.

... २

२. अपील क्रमांक २६१३/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते मी दिनांक २१.५.२००७ रोजी आपले कार्यालयात सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता. जि. चंद्रपूर यांची चौकशी करुन योग्य कार्यवाहीसाठी तक्रार पाठविली होती. ते तक्रारपत्र आपणाला दिनांक २३.५.२००७ ला प्राप्त झाले. त्या तक्रारपत्राची प्रमाणित झेरॉक्स प्रत आणि ती तक्रार आपणास दिनांक २३.५.२००७ ला प्राप्त झाल्यावर आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देण्यात यावा. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.७.२००७ रोजी शासकीय जनमाहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर या कार्यालयाकडे दाखल केलेल्या अर्जाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांचे तक्रारीची मूळ प्रत चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्याकरिता या कार्यालयाचे दिनांक १८.६.२००७ चे पत्राद्वारे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांचेकडे पाठविण्यात आली असून केलेल्या कार्यवाहीबाबत तक्रारकर्त्यास अवगत करण्याबाबत सूचित केले आहे. चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे. त्यामुळे तक्रारीची सत्यप्रत सद्य:स्थितीत देणे शक्य नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक २४.९.२००७ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो व अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २५.६.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याबाबत त्यांनी असे सांगितले की, दिनांक २१.५.२००७ च्या तक्रारीची प्रत तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या दोन बाबी त्यांनी मागितल्या होत्या. परंतु त्याबाबत त्यांना ती माहिती उपलब्ध झाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.५.२००७ रोजीची तक्रार ही जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांच्याकडे पाठविण्यात आलेली असल्यामुळे त्यांचेकडे उपलब्ध नाही. परंतु सदरची प्रत त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल व चौकशीची प्रत उपलब्ध झाल्यानंतर अहवाल

सुध्दा उपलब्ध करुन देता येईल. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारात कोणत्याही संस्थेचे चौकशीची मागणी केली नाही असे दिसून येते. त्यांनी दिनांक २१.५.२००७ च्या तक्रारीच्या अर्जावर झालेली कार्यवाही मागितली होती. त्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जो निष्कर्ष काढण्यात आलेला आहे त्याबाबत कोणत्याही प्रकारचे आकलन झालेले दिसून येत नाही. त्यामुळेच चुकीचा निष्कर्ष काढण्यात आलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२००७ ची तक्रार ही सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांचे विरुध्द आहे व त्याची चौकशी करुन त्यांनी माहिती मागितलेली आहे. तरी सदरच्या तक्रारीची चौकशी करुन अपीलकर्ता यांना चौकशी अहवाल उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक २६१४/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मी आपले कार्यालयात दिनांक ११.६.२००७ रोजी रजिष्टर एडीने श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, बल्लारपूर, जि. चंद्रपूर सहीत पाठराखण करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन दोषीवर कार्यवाही करण्याबाबत तक्रार दाखल केली होती. त्या तक्रार पत्रावर आपण आतापर्यंत कोणती कार्यवाही केली याबाबत अहवाल देण्यात यावा. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.९.२००७ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था तथा शासकीय माहिती अधिकारी (पतसंस्था) सहकार आयुक्त, पुणे यांचे कार्यालयातून अपीलकर्ता यांचा दिनांक ११.६.२००७ चा तक्रार अर्ज पुढील योग्य ती कार्यवाही करण्याकरिता विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे या कार्यालयाच्या दिनांक १८.७.२००७ च्या पत्रान्वये पाठविण्यात आला आहे. सदर संस्था ही वैधानिकदृष्टया विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांच्या कार्यकक्षेत असल्याने आपण त्यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. यावरुन त्या उत्तरावरुन त्या विभागाची कार्यवाही संपली आहे त्यामुळेच अशा प्रकारची माहिती अपीलकर्ता यांना कळविलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. परंतु प्रथम अपीलाचे सुनावणीची नोटीस ही सुनावणीचे तारखेच्या नंतर अपीलकर्ता यांना मिळाल्यामुळे त्यांना

... ४

सुनावणीस उपस्थित राहता आले नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. दाखल केलेल्या कागदपत्रावरुन सुध्दा कार्यालयातील जावक दिनांक व सुनावणीचा दिनांक यामध्ये कालावधी हा अत्यंत कमी असल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरचे पत्र ही सुनावणीचे तारखेनंतरच मिळाली आहेत हा निष्कर्ष काढावा लागतो. याबाबत अपीलकर्ता यांना सुनावणीची तारीख देतांना दक्षता घेणे आवश्यक आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती मात्र विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. मात्र अपीलकर्ता यांना दिनांक ११.६.२००७ च्या दिलेल्या तक्रार अर्जाचे संदर्भामध्ये विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांनी चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल हा अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २६१३/२००७ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २५.६.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत त्यांनी केलेल्या तक्रार अर्जाच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्या व ३० दिवसाचे आंत तक्रारीमधील चौकशी अहवाल रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) अपील क्रमांक २६१४/२००७ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ११.६.२००७ च्या तक्रार अर्जाप्रमाणे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांनी चौकशी करुन अपीलकर्ता यांना अहवाल विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- ५.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/११४४-११४७/५.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६१९/२००७.**

श्री. बजरंग शर्मा (पंडिया),
११३, तुलसीनगर, इतवारी,
नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उद्योग सहसंचालक,
उद्योग भवन, दुसरा माळा,
सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. जी. एस. उमाप,
जनमाहिती अधिकारी तथा
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२००९)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२००७ रोजी जनरल मॅनेजर, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. स्वेतल स्टील इन्डस्ट्रीज तथा प्रशांत स्टील इन्डस्ट्रीज प्लॉट नं. १८४ स्माल फेक्ट्रीचा ऐरिया, बगडगंज, नागपूर तथा प्लॉट नं. ३१, ३२ चिखली ले आऊट, कलमना रोड, नागपूर के निचे लिखे मुताबिक जानकारी व कागजात देने की कृपा करेंगे. १) स्वेतल स्टील इंडस्ट्रिल (१) EC No. ११७०/DCVL/PSI-७९ copy, (२) SSI Registration copy. २) स्वेतल स्टील इंडस्ट्रिज

... २

(लिमिटेड) (१) SSI Registration copy. ३) प्रशांत स्टील इंडस्ट्रिज (१) DIC/PSI/९३/FC No. ६९१, Date २७.९.२००२ Copy, (२) SSI Registration copy. सदरचा अर्ज हा प्रपत्र - अ या नमुन्यात नाही. त्याबद्यल माहिती कशी घेणार त्याबद्यलचा कोणत्याही प्रकारचा उल्लेख केलेला नाही. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.११.२००७ रोजी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या नियम ८(च) नुसार माहिती पुरविता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ४.१२.२००७ रोजी उद्योग सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.१२.२००७ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम ११(१)(२) मध्ये अंतर्भुत असलेल्या इतर कमलान्वये प्रथम त्रयस्थ पक्षाकडून माहिती प्राप्त करावी व त्यानंतर अर्जावर उचित कार्यवाही करावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीत अपीलकर्ता यांचे वकील श्री. आर. एच. अग्रवाल यांनी युक्तिवाद केला. युक्तिवादामध्ये त्यांनी अधिनियमाचे कलम ८(घ) प्रमाणे सदरची माहिती ही वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता व्यावसायिक गुपिते किंवा बौध्दिक संपदा यामध्ये येत नाही व त्यामुळे ती प्रकट करणे व अपीलकर्ता यांना देणे आवश्यक होते असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य नाही त्याकरिता त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु प्रथम अपीलामध्ये सुनावणी झाली असूनही निर्णय देतांना जनमाहिती अधिकारी यांच्या निर्णयाचे संदर्भात कोणत्याही प्रकारचे भाष्य न करता कोणतीही माहिती ही त्रयस्थपक्षाची माहिती असल्यामुळे अधिनियमाचे कलम २(ढ) प्रमाणे त्रयस्थपक्षाची असली तरी संबंधित जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अशाच प्रकारची माहिती पूर्वी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे ती त्रयस्थपक्षाची माहिती होत नाही असे त्यांनी प्रतिपादन केले.

४. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, इलेक्ट्रॉनिक प्रकल्प किंवा उद्योगाचे संपूर्ण प्रकल्पाचे स्वरुपात माहिती असते व त्यामुळे अशा प्रकारची माहिती प्रकट केली तर त्या माहितीचा गैरवापर होण्याची शक्यता असते व तसेच व्यावसायिक गुपिते त्या योजनेची किंवा प्रकल्पाची संपूर्ण माहिती होती व त्यातही स्पर्धात्मक माहिती होत असल्यामुळे ती माहिती देण्याचा नकार दिलेला आहे व तसेच कोणत्याही प्रकारची व्यापक जनहित साधत नसल्यामुळे त्याबाबत निर्णय देण्यात आलेला आहे. यापूर्वी अपीलकर्ता यांनी अनेक अर्जाचे माध्यमातून त्यांना ती माहिती उपलब्ध करुन दिल्यावर त्या त्या संबंधित त्या त्या प्रकल्पाच्या तक्रारी उद्योग संचालकाकडे आल्यामुळे सदरचीही माहिती दिलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. १) अपीलकर्ता अर्जदार श्री. बजरंग शर्मा हे मॉ चंडिका नावाच्या साप्ताहिकांचे संपादक आहेत. आजपर्यंत जिल्हा उद्योग केंद्र, नागपूरकडे माहितीच्या अधिकारात एकूण ३२ अर्ज त्यांनी दाखल केलेले आहेत. (अर्जाची यादी परिशिष्ट-१ प्रमाणे जोडलेली आहे) २) अर्जदार हे नेहमी वैयक्तिक घटकांबाबत माहिती मागत असून शासकीय योजनांबाबत किंवा धोरणाबाबत कधीही माहिती मागत नाही. या कार्यालयातर्फे प्राप्त माहितीचा वापर ते वैयक्तिक घटकांकडून त्यांचे वर्तमानपत्रात बदनामीची धमकी देऊन त्यांना ब्लॅकमेल करण्याकरिता करतात असे वैयक्तिक घटकांनी या कार्यालयास दिलेल्या निवेदनावरुन समजते. ३) एका प्रकरणामध्ये वैयक्तिक घटक अर्जदारांच्या विरोधात न्यायालयात गेल्यावर न्यायालयाने सुट क्रमांक ७७४/२००६ मध्ये अर्जदाराला संबंधित घटकाचे विरोधात बदनामीकारक बातमी छापण्यास मनाई केलेली आहे. ४) तसेच अर्जदाराने महाराष्ट्र शासन, काही शासकीय विभाग तसेच मे. अभिनव फूड प्राडक्टस संदर्भात दाखल केलेल्या क्रिमिनल रिट पिटीशन क्रमांक ५४/२००७ मध्ये न्यायालयाने अर्जदाराचे विरोधात निकाल दिला आहे. (निकालाची प्रत जोडली आहे परिशिष्ट-२) ५) एकंदरीत अर्जदाराच्या वेळोवेळी या कार्यालयाकडे केलेल्या माहितीचा अधिकार अर्जावरुन संबंधित घटकांना त्रास देणे तसेच संबंधित विभागांना अवास्तव व मोठया प्रमाणात माहिती मागून कार्यालयाचे कामात अडथळा निर्माण करण्याची वृत्ती दिसून येते. ६) या अपील क्रमांक २६१९ मध्ये देखील त्यांनी वैयक्तिक घटकांची माहिती मागितलेली आहे व ती माहिती दिल्यास संबंधित घटकांचे वाणिज्य क्षेत्रातील व्यवसायातील खाजगी माहिती उघड होणार असल्यामुळे सदर अर्जदारास ती माहिती नाकारण्यात आली. अपीलीय अधिकाऱ्यांनी देखील या कार्यालयाच्या निर्णय योग्य

ठरवून त्याप्रमाणे त्यांचा निर्णय दिलेला आहे. ७) तरी वरील एकंदरीत परिस्थितीचा विचार करता व मिळालेल्या माहितीचा गैरवापर करण्याची अर्जदाराची वृत्ती बघता अर्जदाराचे अपील फेटाळण्यात यावे अशी या कार्यालयातर्फे विनंती करण्यात येते. असे असल्यामुळे प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये सदरची माहिती ही त्रयस्थपक्षाच्या संदर्भात असल्यामुळे किंवा त्रयस्थ पक्षाने शासनाकडे दिलेली असल्यामुळे सदरची माहिती प्रकट करण्याच्या पूर्वी त्रयस्थ पक्ष म्हणून त्या पक्षास विचारणा करणे आवश्यक असल्यामुळे तशा प्रकारचा निर्णय देण्यात आलेला आहे. जनमाहिती अधिकारी यांचेकडे सहसंचालक पदाचा भार असल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सुध्दा युक्तिवाद आयोगाकडे केला. अर्थातच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णयाप्रमाणे कलम ११(१) प्रमाणे कार्यवाही सुरु करणे हे आवश्यक होते. परंतु त्यांनी सदरच्या घटकाला विचारणा करण्यात आली व त्यांना माहिती प्रकट करण्यात येऊ नये असे त्यांनी तोंडी सांगितले. परंतु त्यामुळेच कलम ११(१) प्रमाणे सुरु करावयाची असते. त्यावर ती अपीलकर्ता यांना कळवावयाची असते व तसे ती दिलेली नाही असे वकीलांनी सांगितले व त्यामुळे त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे त्यांचे म्हणणे आहे व त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादण्याची त्यांनी विनंती केलेली आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचा विचार केल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची टाळाटाळ केलेली आहे असे दिसून येत नाही. त्यांच्याकडे असलेल्या अनुभवाप्रमाणे त्यांनी सदरची माहिती ही प्रकट करण्यास अपवाद केलेला दिसून येतो. अर्थात यामध्ये आदेश देतांना तो कारणमिमांसाची माहिती असावयास पाहिजे व त्यामुळे त्यांना माहिती नाकारतांना ती सद्‌भावनेने नाकारली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे प्रकिया सुरु करण्याचे आदेश दिलेले असल्यामुळे तरी अपीलकर्ता यांना त्याबाबत कळविलेले नसल्यामुळे पुन्हा तशा प्रकारची प्रक्रिया सदरच्या घटकांना अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे करुन अपीलकर्ता यांना कळवून माहिती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील.

... ५

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक १.११.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्या पासून ३० दिवसाचे आंत जो आदेश दिलेला आहे त्या आदेशा प्रमाणे कलम ११(१) प्रमाणे प्रक्रिया सुरु करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भात उचित कार्यवाही करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ५.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५६४/२००७ व अपील क्रमांक २५६५/२००७.

श्री. डॉ. विजयकुमार नामदेवराव इंगळे,
बुराडे-ले-आऊट, देशमुख वाडी जवळ,
शिवसेना चौक, आलोटी, पो. मानसमंदीर,
ता. जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. एम. के. पवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष, शिव वैभव संस्था,
शिव वैभव शिक्षण महाविद्यालय,
बॅचलर रोड, कुमारप्पा मार्ग,
आर्वी नाक्याजवळ, वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष, शिव वैभव संस्था,
शिव वैभव शिक्षण महाविद्यालय,
बॅचलर रोड, कुमारप्पा मार्ग,
आर्वी नाक्याजवळ, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ५.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. व्ही. जी. भांबोरकर, वकील हे हजर आहेत.

... २

२.  अपील क्रमांक २५६४/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, शिव वैभव संस्था, वर्धा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. विद्यापीठाचे ग्रीव्हन्स कमिटीचे निर्णयानुसार मी दिनांक २५.१०.२००५ रोजी शिव वैभव शिक्षण महाविद्यालयात रुजू झालो व अजूनही मी कार्यरत आहे.  तरी सुध्दा अजूनही मला आपणाकडून पगार मिळालेला नाही.  हा पगार मला कां देण्यात आला नाही याची माहिती मला देण्यात यावी.  माहितीचा कालावधी १५ जुलै, २००३ पासून अजूनपर्यंत.  सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २१.५.२००७ रोजी अध्यक्ष, शिव वैभव शिक्षण महाविद्यालय, वर्धा यांनी मागितलेली संपूर्ण माहिती ही मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर रिट याचिका क्रमांक ६६०१/२००५ मध्ये दाखल केलेल्या माहितीशी निकडीत असल्यामुळे न्यायप्रविष्ट आहे व त्यामुळे ही माहिती आपणास पुरवू शकत नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते.  सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२००७ रोजी प्रथम अपील प्र-कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे केलेले दिसून येते.  सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक १४.६.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी हे कुलगुरु नसून कुलसचिव व माहिती अधिकारी यांनी खाजगी व्यवस्थापना अंतर्गत असलेल्या महाविद्यालयातील वेतन विवरणासंबंधातील बाबी विद्यापीठाकडून हाताळल्या जात नसल्याबाबतची वस्तुस्थिती दिनांक २४.५.२००७ रोजी त्यांच्या ४.५.२००७ रोजी मागितलेल्या माहितीच्या अर्जाचे संदर्भात पत्राद्वारे संबंधितांना कळविलेली आहे.  तसेच वेतनासंबंधीतील आपल्या तक्रारीकरिता आपण योग्य चाकोरीतून संबंधित अधिकारी यांचकडे संपर्क साधू शकता असेही सुध्दा नमुद केले आहे.  उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता अर्जदाराने मागितलेली माहिती निर्धारित कालावधीत अर्जदाराला पुरविलेली आहे.  परंतु माहितीमध्ये नमूद केल्याप्रमाणे तक्रारी करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यासंबंधी माहिती कळविलेली नाही.  त्यामुळे अर्जदाराला वेतनासंबंधी तक्रार करण्याकरिता संबंधित अधिकारी यांच्या पूर्ण तपशील देण्यात यावे असा निर्णय कळविलेला दिसून येतो.  त्यानंतर दिनांक ३१.८.२००७ रोजी अपीलेट अधिकारी म्हणून शिव वैभव संस्था व शिव वैभव शिक्षण महाविद्यालय, बॅचलर रोड, वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.  प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २०.९.२००७ रोजी ३ मुद्यांच्या माध्यमातून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सोबत यशवंतराव चव्हाण

मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र व वर्धा नागरी सहकारी अधिकोष बँकेचे पत्र व विवरण उपलब्ध करुन दिलेले दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितील अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये विद्यापीठाचे ग्रिव्हन्स कमेटीच्या निर्णयानुसार मी दिनांक २५.१०.२००५ रोजी शिव वैभव शिक्षण महाविद्यालय, वर्धा येथे रुजू झालो व अजूनही मी कार्यरत आहे. तरीसुध्दा अजूनही मला आपणाकडून पगार देण्यात आलेला नाही. याबाबत मी कशाप्रकारे जीवन जगावे याची माहिती मला देण्यात यावी असे कारण दिलेले दिसून येते व दिनांक १५.७.२००३ पासून ते ४.८.२००४ तसे २५.१०.२००५ ते आजपर्यंतचा पगार, अरीअर्स इत्यादी मला दिले नाहीत असेही कारण दिलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना माहिती त्यांना विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही असा युक्तिवाद केलेला आहे. परंतु दिनांक २१.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना संस्थेचे अध्यक्ष यांनी उत्तर दिलेले दिसून येते व त्यानंतर सुध्दा दिनांक २०.९.२००७ रोजी मुद्येनिहाय उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांची तक्रार ही त्यांना वेतन मिळाले नाही हेच कायम आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे वकीलांनी वरील प्रमाणे युक्तिवाद केला व सदरचा खुलासा दाखल केलेला आहे. गैरअर्जदार नं. १ व नं. २ चे लेखी बयान खालीलप्रमाणे गैरअर्जदार नं. १ ही संस्था सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये पंजीबध्द असून तिचा पंजीबध्द क्रमांक एफ/४६४/(वर्धा) व ही संस्था सोसायटी रजि. ॲक्ट १९६० पंजीयन क्रमांक महा./१७/८३(वर्धा) अन्वये पंजीबध्द आहे. या संस्थेच्या वतीने गैरअर्जदार नं. २ बी.एड्. महाविद्यालय विना अनुदान तत्वावर सन १९८६-८७ पासून महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक एसटीसी/२०८६/३१३/८६ नागपूर दोन शिक्षण व सेवायोजन विभाग, माशि-०४ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२, दिनांक १७ जुलै १९८६ नुसार वर्धा येथे शिव वैभव शिक्षण महाविद्यालय सुरु आहे. हया पत्रातील पान क्रमांक २ वरील अट नं. ३, ४ नुसार हया महाविद्यालयास कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही व ते नागपूर विद्यापीठाशी संलग्न आजतागायत पर्यंत आहे. अर्जदार श्री. डॉ. विजयकुमार नामदेव इंगळे हे या महाविद्यालयात प्रथम प्राध्यापक व

त्यानंतर काही काळ प्राचार्य होते. हे महाविद्यालय विना अनुदान तत्वावर असल्यामुळे शासनाकडून शिक्षकांचे वेतनावर कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही. अर्जदाराने अपील मध्ये त्यांच्या विषयांत मांडलेल्या तक्रारीचे स्वरुप हे न्याय प्रविष्ट आहे. असे त्यांनी म्हटले आहे त्याबद्यल सुध्दा नागपूर विद्यापीठाच्या ग्रिव्हन्स कमेटीच्या निर्णयानंतर त्यांचे विरोधात संस्थेने नागपूर हायकोर्टामध्ये ग्रिव्हन्स कमेटीच्या विरोधात संस्थेला मिळाला होता व नंतर तो सदरहु रिट पिटीशन मध्ये खारीज करण्यात आला. त्यांचे विरोधात संस्थेने गैरअर्जदार नं. १ व २ यांनी नागपूर हायकोर्टामध्ये एल.पी.ए.नं.९०/२००६ सुरु आहे व त्यामध्ये संस्थेला स्टेटस को मिळाला. हे अर्जदाराने आपल्या विषयात नमूद केले आहे. म्हणजेच श्री. इंगळे हे महाविद्यालयांत प्राचार्य नाही व विषयांत उल्लेख केलेल्या पगाराचा व अन्य प्रश्न न्याय प्रविष्ठ आहे. या कोर्ट केसेसची व आदेशाची माहिती अर्जदारांना आहे. तसेच गैरअर्जदार नं. १ यांनी त्यांच्या अपीलमध्ये एस.व्ही.सी./६२७/२००७, दिनांक २१.५.२००७ पत्र जोडले आहे. याशिवाय त्यांना त्यांच्या व दिनांक २३.५.२००७ च्या पत्रास त्यांनी मागितलेल्या पत्रांचे उत्तर क्रमांक एस.व्ही./२२३/०७-०८, दिनांक ३१.५.२००७ चे पत्र दिले असून त्यांना ते पत्र दिनांक १.६.२००७ मिळाले आहे. तसेच त्यांनी त्यांचे पत्र दिनांक ३१.८.२००७ च्या पत्राला गैरअर्जदार नं. १ ने दिनांक २०.९.२००७ ला उत्तर दिले आहे. ते उत्तर देखील अपील सोबत त्यांनी जोडले आहे. वास्तविक पाहता सदर महाविद्यालय हे विना अनुदानित असल्यामुळे उत्तर देण्याची गरज नव्हती तरी ते त्यांना देण्यात आले आहे. अर्जदाराची सेवा ही विना अनुदानित शिक्षण महाविद्यालयात झाल्यामुळे माहितीचा अधिकार नियम, २००५ हा अर्जदाराच्या केसला लागू होत नाही हे आम्ही प्रथम आपले निदर्शनास नम्रपणे आणू इच्छितो. करिता हा प्राथमिक मुद्यांचा निर्णय प्रथम देण्यात यावा ही विनंती व त्यानंतर आवश्यकता वाटल्यास सविस्तर उत्तर द्यावयाची संधी देण्यात यावी ही विनंती. सदरच्या खुलाश्यामध्ये अपीलकर्ता यांची विना अनुदानित शिक्षण महाविद्यालयात झाल्यामुळे माहितीचा अधिकार नियम २००५ हा अर्जदाराचया केसला लागू होत नाही हे आम्ही प्रथम आपले निदर्शनास नम्रपणे आणू इच्छितो असा मुद्या उपस्थित केलेला आहे व त्या करिता मा.उच्च न्यायालय, केरळ राज्य यांच्या याचिका क्रमांक ४६६८/२००७ मधील दिनांक ४.७.२००७ च्या ए.आय.आर.२००७ केरला २३० हा निर्णय दाखला म्हणून दाखल केलेला आहे. सदरच्या निर्णयामध्ये (A) Right to Information Act (२२ of २००५) S.२(h) Public authority private aided Colleges controlled and substantially

financed directly or indirectly by funds provided by appropriate Govt. Colleges also privy to information relating to students and staff which is not private or sensitive information private aided college convered by definition of public authority. यावरुन सदरच्या अधिनियमाच्या तरतुदी हया अनुदानित खाजगी महाविद्यालयास लागू आहेत असे दिसून येते. परंतु विना अनुदानित खाजगी महाविद्यालयास सदरचा अधिनियम लागू आहे किंवा नाही याबाबतचे विवेचन सदरच्या निर्णयात केलेले नाही व त्यामुळे सदरचा निर्णय हा विना अनुदानित महाविद्यालयाचे संदर्भामध्ये लागू होत नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा शिव वैभव शिक्षण महाविद्यालय हे विना अनुदानित खाजगी महाविद्यालय असल्यामुळे लागू होत नाही हा मुद्या उपस्थित केल्यामुळे अधिनियमाचे कलम २(ज) मधील सार्वजनिक प्राधिकरणाची व्याख्या तपासून पाहणे आवश्यक आहे. सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ (क) संविधानाद्वारे किंवा तद्न्वये, (ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे, (ग) राज्य विधान मंडळाने तयार केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे, (घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसुचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे, स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था असा आहे आणि त्यात (एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्यांचे नियंत्रण असलेला किंवा त्यांच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो असा निकाय. (दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे ज्यांना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना यांचा समावेश आहे.

५. वरील सार्वजनिक प्राधिकरणाच्या संज्ञेच्या व्याख्येतील निकष हे अनेक आहेत व त्या निकषात संस्थेस अनुदान मिळत नाही असा एकमेव निकष नाही. (घ) मध्ये जो निकष दिलेला आहे त्या निकषामध्ये समुचित शासनाने महाराष्ट्र शासनाने अधिसुचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था असा आहे. या निकषाप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक एसटीसी/२०८६/३१३/८६, नागपूर दोन, शिक्षण व सेवायोजना विभाग,

... ६

माशि-०४ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२, दिनांक १७ जुलै, १९८६ चा आदेश हा कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना दिलेला आहे. त्याच आदेशाप्रमाणे विषय १९८६-८७ या शैक्षणिक वर्षापासून १) शिव वैभव शिक्षण संस्था, वर्धा व २) डॉ.बाबासाहेब आंबेडकर एज्युकेशन सोसायटी, चंद्रपूर या संस्थेला अध्यापक महाविद्यालय (बी.एड्. कॉलेज) विना अनुदान तत्वावर सुरु करण्यासंबंधी असा आदेश दिलेला दिसून येतो व त्या आदेशामध्ये १९८६-८७ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर अध्यापक महाविद्यालय सुरु करण्यास शासकीय संमती घोषित करण्यात येत आहे असा प्रकारचा आदेश आहे म्हणजे शासनाचा आदेश आहे. त्यामुळे सदरचे महाविद्यालय या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे अंतर्भुत होते व तसा माहितीचा अधिकार हा लागू होतो. तसेच सदरची संस्था स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण त्या संदर्भात इंग्रजी भाषेतील व्याख्या तपासून पाहिल्यास सदरच्या व्याख्येमध्ये "Established or Constituted" अशी संज्ञा वापरलेली आहे व The Law Lexicon by Bakshi (Ashoka Law House) New Delhi The Terms "Constitute and established " are given follwing meaning :- The word "Constituted" does not necessarily mean "created" or "set up" though it may mean that also. It also includes the idea of clothing the agreement in a legal form. In the Oxford English Dictionary, Vol. II at pages ८७५ and ८७६, the word "Constitute" is said to mean inter alia "to set up, establish, found (an institution, etc)" and also "to give legal or official form or shape to (an assembly, etc.)"

In Shorter Oxford English Dictionary (Third Edition) the word "establish" has been given a number of meanings. i.e., to render stable or firm; to ratify; to confirm, settle, to restore permanently; to affix, settle, institute or ordain permanently; to set up on a secure basis, to found, to set up or bring about permanently.

In Webster's Third New International Dictionary, the word 'establish' has

been given a number of meanings, namely, to found or base squarely to make firm or stable, to bring into existence. Create, make start, originate.

In Bouvier's Law Dictionary (Third Edition), Volume I, the word 'establish' has been given the following meanings, namely, to settle firmly to fix unalterably, as to establish justice, to make or form: as to establish a uniform rule of neutralization, to found, to create, to regulate, to recognize, confirm or admit, to crcate, to ratify, of confirm. While considering this Wanchoo, CJ, in the case of Azeez Basha v. Union of India, AIR १९६८ SC ६६२, observed as follows : The word "establish" means to bring into existence an educational institution while the word "administer" means the right to manage and conduct the affairs of the institution. M. David v. Convenor EAMCET, २०००. Hyderabad. AIR २००१ AP २७८ at २८२. आणि म्हणून घटित किंवा स्थापन या शब्दाच्या अर्था प्रमाणे सुध्दा दिनांक १७ जुलै, १९८६ च्या महाराष्ट्र शासनाचे आदेशाप्रमाणे सदरचे महाविद्यालय "सार्वजनिक प्राधिकरण" या व्याख्ये प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.

६. त्यातही पुन्हा कोणतेही महाविद्यालय यांच्या विद्यापीठाशी संलग्न नसल्यास त्यांच्या कोणत्याही पदवीस मान्यता मिळत नाही व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर हे महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याप्रमाणे स्थापन झाले असल्यामुळे व महाविद्यालयाची संलग्नता ही विद्यापीठाशी असल्यामुळे वरील व्याख्येतून "राज्य विधान मंडळाने मंजूर केलेल्या कायद्यातील" हेही निकष लागू होऊ शकतात. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाची माहिती देणे हे आवश्यक ठरते. अर्थात अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे दिनांक २१.५.२००७ ला जे उत्तर दिलेले आहे ते वर दिल्याप्रमाणे न्यायप्रविष्ट असले तरी माहिती प्रकट करण्याच्या संदर्भामध्ये अधिनियमाचे कलम ८(१)(ख)(बी) कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केली आहे किंवा जी प्रकट

केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल अशी माहिती या दोन्ही बाबीं बाबत न्यायालयाचा स्पष्ट आदेश सादर केलेला नाही त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक राहिल. सदरच्या अपीलामध्ये दिनांक २०.९.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

७. अपील क्रमांक २५६५/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, शिव वैभव संस्था, वर्धा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक १२ व १३ जुलै, २००३ रोजी प्राचार्यांचे आक्षेपास न जुमानता तुम्ही बी.एड्. सत्र २००३-०४ मध्ये अनेक प्रवेशार्थींचे अर्जामध्ये खाडाखोड व हेराफेरी केली. करिता (१) त्या अर्जाच्या झेरॉक्स प्रती (सत्यप्रती), (२) त्यानंतर तुम्ही तयार करविलेल्या सर्व याद्यांच्या झेरॉक्स प्रती (सत्यप्रती), (३) तुम्ही रिजेक्ट केलेल्या अर्जांच्या सत्यप्रती, (४) मी असतानाची रिजेक्ट अर्ज यादी सत्यप्रत देण्यात याव्या. सदरची माहिती ही रजिष्टर पोष्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.५.२००७ रोजी मागितलेली माहिती ही आजच्या घडीला आम्ही दाखल केलेली मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर रिट याचिका क्रमांक ६६०१/२००५ याचा भाग आहे व जेव्हा या संपूर्ण माहितीशी निगडीत बाब ही न्यायप्रविष्ट आहे. जेव्हा ही माहिती आपणास पुरविणे म्हणजे मा.उच्च न्यायालयाचा अवमान करणे होय. तेव्हा ही माहिती आपणास पुरवू शकत नाही किंवा ते पुरविण्याचे कारण नाही ही बाब आपण समजून घ्यावी व तरीही उत्तर त्यांना दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २०.९.२००७ रोजी अध्यक्ष, शिव वैभव, वर्धा महाविद्यालयानी अपीलकर्ता यांना पुर्वीचाच निर्णय कायम ठेवा हे अपील फेटाळण्यात आलेले आहे व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती देण्यासाठी टाळाटाळ केलेली आहे हे अपीलाचे कारण दिलेले आहे. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सुध्दा त्यांच्यातील संस्था वादाच्या संदर्भामध्ये माहितीचा अधिकाराच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता व संस्थेचा वाद हा अधिकारीतेत येत नाही. मात्र त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली

नाही त्याबद्यल दिनांक २१.५.२००७ च्या पत्राच्या विचार केल्यास न्याय प्रविष्ट या कारणाचा संदर्भ दिलेला नाही. न्याय प्रविष्टच्या संदर्भामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे अधिनियमाचे कलम ८(१)(२) प्रमाणे न्यायालयाने स्पष्ट मनाई केली असेल किंवा न्यायालयाचा अवमान होईल अशा प्रकारे माहिती मागितलेली असेल तरच अपवाद करता येतो. परंतु सदरच्या प्रकरणामध्ये मा. न्यायालयाने कोणत्या प्रकारचे आदेश दिलेले आहेत असे आयोगाचे निदर्शनास आणलेले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परंतु सदरचे महाविद्यालय विना अनुदानीत असल्यामुळे माहितीचा अधिकार हा लागू होत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल केला आहे. सदरच्या मुद्यांच्या संदर्भामध्ये अपील क्रमांक २५६४/२००७ मध्ये विस्ताराने विवेचन केलेले आहे व सदरच्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू होत असल्यामुळे हयाही अपीलामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक आहे व त्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपील क्रमांक २५६४/२००७ हे खारीज करण्यात येते.

२) अपील क्रमांक २५६५/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३..५.२००७ च्या अर्जात मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावीत.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- ५.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/११५३-११६१/५.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६२५/२००७.

श्री. बंडू रामचंद्र जांभूळे,
मु. विसापूर (रै.), पो. वायगांव (बु.),
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डब्ल्यू. ए. हिवरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, भद्रावती,
जि. चंद्रपूर.

श्री. सुनिल तुकाराम विरुटकर,
जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष,
ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती,
जलस्वराज प्रकल्प विसापूर (रै)
पो. वायगांव (बु.), ता. भद्रावती,
जि. चंद्रपूर.

श्री. आर. एम. गुरनुले,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती,
जलस्वराज प्रकल्प विसापूर (रै)
पो. वायगांव (बु.), ता. भद्रावती,
जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

... २

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, विसापूर (रै.) यांना माहिती मागितलेली दिसून येते. ग्रामपंचायत सचिव यांनी माहिती अधिकारी म्हणून अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, विसापूर (रै.) यांना माहिती मागितलेली दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक ३१.८.२००७ रोजी अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, विसापूर यांना माहिती मागितलेली दिसून येते. परंतु त्यांच्याकडून आम्हाला माहिती मिळाली नाही. त्यामुळे आम्ही अर्जदारास माहिती देऊ शकलो नाही असा खुलासा केलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती, भद्रावती यांनी अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जलस्वराज प्रकल्प, विसापूर (रै.), तहसिल भद्रावती यांना दिनांक १९.१०.२००७ रोजी सुनावणीचे पत्र दिलेले दिसून येते. त्यावर अध्यक्ष/सचिव, ग्रामिण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, विसापूर यांनी दिनांक १२.११.२००७ रोजी आपण जलस्वराज प्रकल्पाबाबत मागितलेली माहिती रेकॉर्ड ऑडीटला असल्यामुळे सद्य परिस्थितीत माहिती पुरवू शकत नाहीत. ऑडीट झाल्यानंतर ताबडतोब संपूर्ण माहिती आपणास देऊ शकतो. तो पर्यंत मला २० दिवसाची मुदत मिळण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा अपीलकर्ता यांना दिनांक १०.१२.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जलस्वराज प्रकल्प, विसापूर यांना कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असेही दिसून येते व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अध्यक्ष, जलस्वराज प्रकल्प, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, विसापूर यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे हया समितीचे सदस्य आहेत व त्यांना ती माहिती उपलब्ध होऊ शकते. अपीलकर्ता हे समितीचे सदस्य आले तरी त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती देता येत नाही त्यामुळेच जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांना ही माहिती मागावी लागली. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे असे दिसून येते.

... ३

परंतु ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचेवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष नियंत्रण माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी नाही त्यामुळे कोणतेही आदेश हे अध्यक्ष/सचिव पाळत नाही. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचेवर संपूर्ण नियंत्रण व निधी पुरवठा ही अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जलस्वराज प्रकल्प हे आहेत जिल्हा साधन गट प्रमुख, जलस्वराज प्रकल्प जिल्हा परिषद, चंद्रपूर असतात व त्यामुळे ग्राम पंचायत किंवा खंड विकास अधिकारी यांचे कोणते आदेश वर नमुद केल्याप्रमाणे सचिव/अध्यक्ष पाळत नाहीत. त्यामुळे अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी म्हणून अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, यांच्याकडे माहिती मागणे हे संयुक्तिक राहील. त्यानंतर अपील हे अध्यक्ष, जिल्हा साधन गट प्रमुख, जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे दाखल करणे हे संयुक्तिक राहील. त्याकरिता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जलस्वराज प्रकल्प यांनी संबंधित माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती अधिनियमाच्या कलम ५ प्रमाणे करणे आवश्यक राहील. सदरच्या प्रकरणामध्ये अध्यक्ष/सचिव यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे जिल्हा साधन गट प्रमुख, जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेवर रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येत असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी शास्तीची वसुली करणे आवश्यक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जलस्वराज प्रकल्प, विसापूर (रै) यांनी १० दिवसाचे आंत व्यक्तिशः विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जलस्वराज प्रकल्प, विसापूर (रै) यांचे विरुध्द रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसूली अध्यक्ष, जिल्हा साधन गट प्रमुख, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी वसूल करावयाची आहे व तसा अहवाल आयोगाकडे सादर करावा.

३) अध्यक्ष, जिल्हा साधन गट प्रमुख जलस्वराज प्रकल्प तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी अधिनियमाचे कलम ५ प्रमाणे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत नियुक्त करावे.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे पोष्टाने स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ६.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११६२-११६५/६.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६३०/२००७.**

श्री. योगेश्वर हैबतराव मोंढे,
मु. खंडाला, पो. वलनी,
ता. जि. नागपूर - ४४१ ५०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बलदेव सांगोळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघु सिंचाई विभाग,
जिल्हा परिषद, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद सिंचाई,
उपविभाग, हिंगणा,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. शेंद्रे, शाखा अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून उपविभागीय अभियंता, लघु सिंचाई विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. खंडाळा स्थित गाव तलावाच्या २००४ ते २००७ पर्यंत झालेल्या खोदकाम व सांडव्याचे सिमेंट बांधकामाचे प्राकलन व

... २

खर्चाचा विवरण तपशील व कार्यवाहीबाबत. माहितीचा कालावधी २००४ ते २००७ (अ) २००४ ते २००७ दरम्यान संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना ४०% निधीमधून जिल्हा निहाय नियमाची माहिती व कामावर झालेला प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षाचा मजूरी विवरण व प्राकलन (अंदाजपत्रक) व मस्टर रोल व संपूर्ण झालेल्या आजपर्यंत खर्चाचा तपशीलाची छायांकित सत्यप्रतिलिपी. (ब) खोदकाम, बांधकाम व घनमिटरमध्ये झालेले काम त्यांची लांबी, रुंदी, उंची मजूरांना दिलेले दर, तलावाच्या भिंतीची उपचाराबाबत सद्यस्थिती. (क) तलावाच्या कामावर ग्रामपंचायतची Noc व दिलेल्या ठरावाची छायांकित सत्यप्रतिलिपी व त्याबाबत कार्यवाही. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.६.२००७ रोजी मागितलेल्या माहितीचे पृष्ठ ७० असून अतिरिक्त खर्च रुपये १४०/- चा भरणा करावा व माहिती घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. दिनांक १६.७.२००७ रोजी १४०/- रुपयांचा भरणा केलेला दिसून येतो व त्यानंतर दिनांक ६.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००७ रोजी कार्यकारी अभियंता, लघु सिंचाई विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलात माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे व उपलब्ध झालेल्या माहितीमधून पुन्हा प्रश्न उपस्थित करुन नवीन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना सुनावणीस उपस्थित राहण्यास कळविले होते. परंतु अपीलकर्ता हे सुनावणीस हजर झाले नाही व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा झालेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी चुकीची व खोटी माहिती दिली व खरी माहिती दिली नाही असे कारण दिलेले आहे.

४. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती चुकीची व खोटी आहे असे त्यांनी अपील मेमोमध्ये नमुद केले असले तरी ती माहिती कशी चुकीची व खोटी आहे याबाबतचा खुलासा आयोगाकडे केलेला नाही. प्रथम अपीलाचे सुनावणीस सुध्दा ते हजर झाले नसल्यामुळे सदरची माहिती त्यांना जशी आहे तशी उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११६६-११६८/६.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६२३/२००७.**

श्री. समीर महादेव गोस्वामी,
पडोळे नगर, वाठोडा रोड,
नागपूर - ४४० ००८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र कुलगुरु,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

श्री. सुभाष बेलसरे,
जनमाहिती अधिकारी तथा
कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. राष्ट्रीय विकास सेवा सहकारी संस्था मर्या, नागपूर (एस ४१४/२००६) द्वारा सचिव, श्री. समीर महादेवजी गोस्वामी, पडोळे नगर, वाठोडा रोड, नागपूर १) शासन निर्णय १.२ नुसार दिनांक १७.३.२००७ व १८.७.२००७ रोजी

... २

अर्ज केला असता अर्जाचे काय झाले ? आमच्या संस्थेचा अर्ज विचारात घेऊन आपल्या विभागामार्फत काम मिळणार नाही काय ? २) त्याचप्रमाणे आपल्या विभागाचे कॉलेजपण आहेत त्या कॉलेजमध्ये फर्नीचर, रंगाई आणि किरकोळ कामे निघतात. शासन निर्णयानुसार ५,००,०००/- (पाच लक्ष) च्या आंत मधील कामे विना निविदा सेवा सहकारी संस्थांना देण्याचा आदेश असून त्यानुसार आपल्या विभागामार्फत किती सेवा सहकारी संस्थेला काम देण्यात आले ? आणि दिले नसेल तर का नाही दिले ? व भविष्यातही देणार नाही का ? देणार असाल तर त्याला किती कालावधी लागेल आणि त्याचे स्वरुप कोणते असणार ? ३) त्याचप्रमाणे आपले कार्यालयात रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाने कामाची यादी मागविली आहे तर आपण त्या यादीत आमच्या संस्थेच नाव पाठविणार किंवा नाही ? माहितीचा कालावधी २५ नोव्हेंबर, २००२ ते आजपर्यंत ३१.८.२००७ सदरची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे दिनांक २८.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २९.१०.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.१२.२००७ रोजी दिलेला असून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा कायम करण्यात आलेला असून विचारलेले प्रश्न माहितीच्या व्याख्येत समाविष्ट होत नसल्यामुळे आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे नमुद तरतुदीनुसार बंधनकारक नसल्यामुळे दाखल करण्यात आलेली अपील खारीज करण्यात आली आहे. सदरचा निर्णय हा दिनांक १७.१२.२००७ रोजी कळविण्यात आलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचे निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सचिव, राष्ट्रीय विकास सेवा सहकारी संस्था मर्यादित, नागपूर ही बेरोजगार यांची संस्था आहे व त्यांच्या संस्थेचा अर्ज विचारात घेऊन आपल्या विभागामार्फत कामे मिळणार नाही काय असे त्यांनी विचारले आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही प्रस्तावाचे संदर्भामध्ये निर्णय हा अपेक्षित करता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना काम मिळणार नाही काय असे

... ३

विचारलेले आहे हे अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे नाही. तसेच दिनांक १७.३.२००७ व १८.७.२००७ रोजी अर्ज केला होता त्या अर्जाचे संदर्भात कार्यवाही काय झाली असे ही त्यांनी विचारलेले आहे. परंतु सदरचा अर्ज हा विद्यापीठास प्राप्त नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे त्यावर कोणत्याही प्रकारचा निर्णय देता येत नाही. परंतु जनमाहिती अधिकारी तसेच विद्यापीठ अभियंता यांनी असे सांगितले की, सदरच्या संस्थेची त्यांचे विद्यापीठाकडे संबंधित विभागाकडे संस्थेनी नोंद करावी म्हणजे त्या संस्थेचा विचार त्या वेळेस करता येईल. नोंद केल्या शिवाय कोणत्याही प्रकारची कामे हे कोणत्याही व्यक्तिश व संस्थेस देता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी विद्यापीठ अभियंता यांचेकडे संपर्क करुन नियमाप्रमाणे नोंद करुन घेऊन कामाची मागणी करणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ६.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११६९-११७१/६.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६२६/२००७.**

श्री. शोएब अहमद कन्नौजी,
इतवारा चौक, वर्धा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुशांतकिरण द. बनसोडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार, वर्धा.

श्री. डी. एस. कारंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार, वर्धा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, वर्धा यांचेकडे एकूण १९ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२००९ रोजी आयोगाकडे दिलेल्या निवेदनानुसार माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, वर्धा यांनी दिनांक २०.१२.२००७ रोजी माहिती प्राप्त करुन दिलेली आहे असे अपीलकर्ता यांनी लेखी लिहून दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ६.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११७२/६.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६३१/२००७.

श्री. केशव रामचंद्र डंभारे,
मु. पो. वलनी,
ता. जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. ए. मित्रा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
सामाजिक वनीकरण विभाग,
नागपूर.

श्री. एम. के. मोटघरे,
जनमाहिती अधिकारी तथा
लागवड अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. वलनी येथील वृक्षारोपनबाबत केलेल्या कामाच्या संदर्भात २००४ ते २००७ पर्यंत खर्चाचा विवरण तपशील व कार्यवाहीबाबत

... २

१) सन २००४ ते २००७ दरम्यान संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना ४०% निधी मधुन जिल्हा निहाय नियमाची माहिती व कामावर झालेल्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचा मंजूरी वितरण व प्राकलन (अंदाजपत्रक) व मस्टर रोल, संपूर्ण आजपर्यंत झालेल्या खर्चाचा तपशिलाची छायांकित सत्यप्रतिलिपी. २) वृक्षारोपनामध्ये किती व कोणत्या प्रजातीची झाडे लावल्या गेलीत त्याची प्रत्येक रोपाची शासकीय किंमत, आगीमधून किती झाडे वाचलित व सद्यस्थिती. ३) वलनी आदर्श गावामध्ये सर्व कामे संस्थाद्वारे करण्यात यावे असे अपेक्षित असल्यामुळे संबंधित एन.जी.ओ. ची एन.ओ.सी. प्राकलनामध्ये आस्थापना खर्च (ना हरकत प्रमाणपत्र) व त्यांचे विवरण व आस्थापना खर्च कुणाला मिळणार त्याबद्यल कार्यवाही. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३१.७.२००७ रोजी तपशीलाची छायांकिंत सत्यप्रतिलिपी तयार करण्याकरिता रुपये ६२०/- इतका खर्च येईल. चलानद्वारे भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक २२.८.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १५.१०.२००७ रोजी जी कार्यालीयनी माहिती यापूर्वी मागितलेली होती ती आपणास पुरविण्यात आलेली आहे. वरील अपील अर्जाचे स्वरुप तक्रारीचे असल्याने आपण वेगळयाने संबंधित अधिकाऱ्यास अर्ज करावा असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये खरी माहिती ऐवजी खोटी माहिती दिली असे माहितीचे कारण दिलेले आहे व माहितीच्या तपशीलामध्ये उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे केलेल्या कार्यवाही बद्यल तक्रार केलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात जी माहिती अभिलेख, कागदपत्रे, दस्तऐवजाचे स्वरुपात उपलब्ध असतील त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व ती अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली आहेत. उपलब्ध झालेल्या माहितीत कोणत्याही प्रकारची अनियमितता असली तरी त्याकरिता स्वतंत्रपणे तक्रार सक्षम अधिकाऱ्याकडे करावी अशी संकल्पना आहे. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे ते योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २३.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ७.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६३२/२००७ व अपील क्रमांक २६३३/२००७.

श्री. युवराज नत्थुजी सोमकुवर,
मु. महालगांव, पो. दिघोरी (काळे),
ता. कामठी, जि. नागपूर - ४४१ २०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपंग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, ३, चर्च रोड,
पुणे - १.

जनमाहिती अधिकारी तथा
अपंग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, ३, चर्च रोड,
पुणे - १. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ७.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपील क्रमांक २६३२/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी म्हणून आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. जीवन शिक्षण संस्था द्वारा संचालित जयंती ज्योती मुकबधीर निवासी शाळा, नागपूर बाबत प्रथम चौकशी अहवाल मिळणेबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२००७ रोजी व

... २

दिनांक २६.७.२००७ रोजी स्मरणपत्र सुध्दा दिलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १.११.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी श्री. राम गायकवाड, आयुक्त, अपंग कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले होते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी, आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे-१ हे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून आढळून येतात. त्याच प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले दिसून येते. एकूणच आयुक्त, अंपग कल्याण आयुक्तालय, पुणे यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाची किंवा अपीलाची कोणतीही दखल घेतली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक २६३३/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२००७ रोजी माहिती अधिकारी श्री. राम गायकवाड, आयुक्त, अपंग कल्याण विभाग, पुणे यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. अपंगाच्या शाळेच्या मान्यतेबाबत. १) राम गायकवाड, आयुक्त, अपंग कल्याण विभाग, पुणे रुजू झाल्या पासून अपंगाच्या किती नवीन शाळांना अनुज्ञाप्ती दिली ? प्रवर्गवार, संस्था निहाय, शाळा निहाय व अनुज्ञाप्ती कालावधी नमुद करुन माहिती द्यावी. २) अपंग शाळांना मान्यता देण्यासाठी मास्टर प्लॅन तयार करण्याच्या सुचना जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या काय ? सुचना दिली नसल्यास कारणे कोणती ? ३) दिनांक १९ जुलै, २००३ च्या शासन निर्णयातील अट ४ प्रमाणे व ४ डिसेंबर, २००३ प्रमाणे नवीन अपंग शाळा मंजूरीचा मास्टर प्लॅन तयार न करता व मास्टर प्लॅन शासनाकडून मंजूर करुन न घेता या निर्णयाला डावलून अपंग शाळांना परस्पर अनुज्ञप्ती कोणत्या नियमाखाली देण्यात आली ? यासाठी कोणाची परवानगी घेण्यात आली होती ? यासंबंधातील पत्राची झेरॉक्स प्रत द्यावी. ४) जिल्हा निहाय अपंग शाळांची संख्या किंवा

... ३

कोटा न ठरविता तसेच कोणतेच निकष न ठरविता वाटेल तशी अनुज्ञप्ती कोणत्या नियमाखाली देण्यात आली ? नियम नमुद करावा. ५) अनुज्ञप्ती नुतनीकरणाची किती प्रकरणे आयुक्तांकडे प्रलंबित आहेत. प्रस्ताव प्राप्तींची दिनांकासहित शाळा निहाय माहिती द्यावी. तसेच प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे कोणती ? ६) प्रलंबित नवीन अनुज्ञप्तीची जिल्हा निहाय व संस्था निहाय तसेच प्राप्त प्रस्तावाच्या दिनांकासहित माहिती द्यावी. प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याची कारणे कोणती ? ७) मास्टर प्लॅन मध्ये नसलेल्या किती २००३ नंतर नवीन शाळा अनुदानावर आणण्यात आल्यात, शासन निर्णयाचे पालन न करता या बेजबाबदारपणाची जबाबदारी कोणाची आहे ? सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील आहेत असे नमुद केलेले दिसते

५. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असे दिसून येते. माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ते दोषी आढळून येतात व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

६. वरील दोन्ही अपीलांच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी हजर नाहीत व त्यांनी कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाहीत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे ग्राहय धरणे संयुक्तिक राहील. आयुक्त, अपंग कल्याण या कार्यालयातील राज्य जनमाहिती अधिकारी हे सुनावणीस हजर राहात नाही हे आयुक्त, अपंग कल्याण यांच्या अकार्यक्षमतेचे प्रतिक आहे किंवा आयुक्त यांना राज्य माहिती आयुक्तांस मुख्य सचिव पदाचा दर्जाचा अधिनियामाने दिला आहे ही बाब आयुक्त यांना मान्य नसावी किंवा इतर अधिकाऱ्यांना सोयिस्करपणे दुर्लक्ष करण्याची सवयीप्रमाणे आयोगापुढे सुनावणीस हजर राहण्याची त्यांना गरज वाटत नसावी किंवा अधिनियमाचे तरतुदींबद्यल त्यांचे अज्ञान तरी असावे.

... ४

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २६३२/२००७ व अपील क्रमांक २६३३/२००७ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २३.४.२००७ व दिनांक २७.९.२००७ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) संबंधित अपंग कल्याण आयुक्तांच्या कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आहेत अशी आयोगाची खात्री झाली असल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे त्यांचे विरुध्द रुपये १०,०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय उपलब्ध झाल्या पासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करावा. अन्यथा शास्ती कायम होईल. सदरची शास्तीची वसुली ही सक्षम अधिकारी यांनी त्यांच्या दरमहिन्याचे वेतनातून वसूल करावयाची आहे व आयोगाकडे तसा अहवाल पाठवावा.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द आयुक्तालयातील सक्षम अधिकाऱ्यांने प्रशासकीय कार्यवाही करावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत सचिव, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. यांच्याकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावा.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ७.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११७६-११७९/७.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६३९/२००७.**

श्री. पांडूरंग किसनजी बजारे,
द्वारा - श्री. खोडे, प्लॉट नं. १८,
रोड नं. ६, बजरंगनगर,
मानेवाडा रोड, नागपूर- ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. मारोतराव बाळाजी श्रीखंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
विदर्भ प्रदेश मराठी भामटी समाज,
५२८-अ, हनुमाननगर, नागपूर- ४४० ००९.

श्री. यादव चिंतामण पजई ,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
विदर्भ प्रदेश मराठी भामटी समाज,
५२८-अ, हनुमाननगर, नागपूर- ४४० ००९. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. गिरीश खोरगडे, वकील यांनी युक्तीवाद केला.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी श्री. मा. बा. श्रीखंडे, अध्यक्ष व श्री. वाय. सी. पजई, सचिव यांचेकडे एकूण २२ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांना तपशीलात मागितलेल्या माहितीच्या

संदर्भामध्ये रुपये ८१२/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी सदरच्या अतिरिक्त रक्कमेचा भरणा न केल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे दिसते. मात्र त्यानंतर दिनांक १२.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी श्री. मारोतराव बाळाजी श्रीखंडे, संस्था अध्यक्ष यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसते. सदरची प्रथम अपील ही स्विकारली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अर्जाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांचे वकील यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांना अर्ज दिनांक ४.१०.२००७ रोजी केलेला आहे व त्यांना दिनांक १६.१०.२००७ रोजी माहितीच्या अतिरिक्त खर्चाकरिता शुल्क भरण्यास कळविण्यात आले होते व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अर्जाचे संदर्भामध्ये विहित मुदतीत कार्यवाही केलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनीच अतिरिक्त खर्चाचा भरणा केला नाही व दिनांक १२.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु मुळात प्रथम अपीलीय अधिकारी हे संस्थेचे अध्यक्ष नव्हते. प्रथम अपीलीय अधिकारी शिक्षणाधिकारी होते व त्यामुळे अपील अर्ज चुकीच्या ठिकाणी केल्यामुळे तेथून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. आता पर्यंत सुध्दा अपीलकर्ता यांना मागितलेल्या खर्चाचा भरणा केलेला नाही. मात्र दिनांक २.२.२००९ रोजी त्यांनी माहिती अधिकारी तथा सचिव यांनी पत्र देऊन माहितीच्या अधिकारातील मागितलेल्या माहितीचा झेरॉक्स खर्च शासकीय नियमानुसार प्रमाणित करुन रोख रक्कमेचे चालान भरुन देण्यात यावे. रुपये भरण्यास मंजूर आहे. रोख रक्कमेचे चलान भरुन दिल्याशिवाय झेरॉक्स खर्च कोषागारात/बँकेत भरता येणार नाही. सहपत्र रोख रोखमेचे चालन फार्म तीन सोबत पाठविलेले आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, चलान भरुन ते मान्य केल्यावर मी रिझर्व्ह बँकेत खर्चाचा भरणा करण्यास तयार आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे वकील यांनी असे सांगितले की, ती कार्यवाही करता येईल व खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती देण्यास तयार आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ७.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६४०/२००७.

श्री. रमेश माणिकराव रेवतकर,
लालगंज, दलालपूरा, इतवारी,,
नागपूर- ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपायुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. एम. आर. गुप्ता,
जनमाहिती अधिकारी तथा
स्थावर अधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२००७ रोजी केंद्रीय जनमाहिती अधिकारी, भारत सरकार, शहरी विकास मंत्रालय, एनयुआरएम, संचालनालय, नवी दिल्ली यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती हॉ/नहीं या स्वरुपाची त्यांनी मागितलेली दिसून येते. सदरचा अर्ज हा महानगरपालिका, नागपूर यांचेकडे हस्तांतर केलेला दिसून येतो. तसेच अपीलकर्ता यांनी नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सुध्दा अर्ज केलेले दिसून येतात व ते सर्व अर्ज महानगरपालिका कडे जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी दिनांक ३१ मे, २००७ व दिनांक १६ जुलै, २००७ रोजी हस्तांतर केलेला आहे असे अपीलकर्ता

... २

यांना कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अनेक अर्ज केलेले दिसून येतात. दिनांक ६.९.२००७ रोजी आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे अपील केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या सर्व अर्जाचे संदर्भात व अपीलाचे संदर्भामध्ये त्या त्या अधिकाऱ्यांनी उत्तर दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी लेखी युक्तीवाद आयोगापुढे सादर केलेला आहे व त्या लेखी युक्तिवादामध्ये त्यांनी सर्व अर्जाचा समावेश करुन त्यांनी विश्लेषण करुन विवेचन केलेले दिसून येते. परंतु माहिती कोणती मागितली याबद्यल कोणताही उल्लेख दिसून येत नाही. अपीलकर्ता यांच्या युक्तीवादावरुन पुन्हा असे दिसून येते की, त्यांना न्यायालयाप्रमाणे निर्णय अपेक्षित होते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कलम ६(१) प्रमाणे माहितीचा अर्ज दाखल करता येतो. त्या अर्जाप्रमाणे माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही तर किंवा उपलब्ध माहितीमुळे समाधान न झाल्यास कलम १९(१) प्रमाणे त्याच सार्वजनिक प्राधिकरणाकडे प्रथम अपील दाखल करता येते व प्रथम अपीलाचा निर्णयाने सुध्दा समाधान न झाल्यास राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करता येते. या तरतुदीशी अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या अर्जाचे संदर्भात तुलना केल्यास अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज केंद्रीय माहिती अधिकारी यांचेकडे केला त्यानंतर अपील महानगरपालिकेकडे दाखल केली यावरुन अपीलकर्ता यांनी कोणत्याही कार्यवाहीचे पध्दतीचे पालन केलेले नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. माहिती मागतांना सुध्दा अपीलकर्ता यांनी अभिप्रायात्मक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. विश्लेषण करुन मत मागितले आहे. जे अधिनियमातील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे अपेक्षित नाही. माहिती या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा. दस्तऐवज, अभिलेख, कागदपत्रे, टिपणी, निर्णय, परिपत्रके यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे. कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये अभिमत अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे सर्व अर्ज, अपील व त्यावरील टिपणी व त्यावरील निर्णय हा माहितीचा अधिकार अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज, प्रथम अपील त्यातील अपेक्षित असलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे अपेक्षित नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- ७.२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५७२/२००७.**

सौ. आशा शिवचरण शेंडे,
संजय गांधी नगर, राणी दुर्गावती, चौक,
नागपूर- ४४० ०१७. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव,
साईकृपा बहुउद्येशिय शिक्षण संस्था,
एस.के.बी.प्राथमिक विद्या मंदीर, यादवनगर,
कामठी रोड, नागपूर - ४४० ०२६.

श्रीमती बेला बुध्दम् मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
एस.के.बी.प्राथमिक विद्या मंदीर, यादवनगर,
कामठी रोड, नागपूर - ४४० ०२६. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक २८.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १४.७.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, एस.के.बी. प्राथमिक विद्या मंदीर, यादव नगर, नागपूर यांना जुलै, १९८८ ते जुलै, १९९० पर्यंतचे कालावधीत सहाय्यक शिक्षक नियुक्तीचे वेळी माझे माहेरचे नांव आशा तुळशीराम बोरकर होते. या नावाने शाळेच्या हजेरीपत्रकातील

... २

जुलै, १९८८ ते जुलै, १९९० पर्यंतचे कालावधीतील हजेरीपत्रकाची सत्यप्रत व सेवापुस्तकाची नोंदीची सत्यप्रत मिळण्याबाबत. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक १३.८.२००७ रोजी मला दिनांक १४.८.२००३ रोजी संस्थेनी प्रभारी मुख्याध्यापिकेचा पदभार दिला तेंव्हा रेकॉर्डचा चार्ज घेत असतांना संदर्भांकित पत्रात मागितल्याप्रमाणे तो रेकॉर्ड आढळून आला नाही. त्यामुळे तो आपणास उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २७.८.२००७ रोजी प्रथम अपील हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे केलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १६.१०.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी शिक्षणाधिकारी हे अपीलीय अधिकारी नसून संस्थेचे अध्यक्ष किंवा सचिव हे आहेत असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ती यांनी दिनांक २७.८.२००७ रोजी पुन्हा माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना अर्ज केलेला दिसून येतो व त्यांनी सुध्दा दिनांक ३.९.२००७ रोजी सदरची माहिती ही शाळा स्तरावरील असल्याने शाळेकडून मागवावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १८.९.२००७ रोजी संस्थेचे सचिव यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.९.२००७ रोजी संस्थेकडे सदरची कागदपत्रे उपलब्ध नाही आणि माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिकेने आपणास दिलेले उत्तर योग्य आहे असे म्हणून अपील खारीज केलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी सांगितले की, सध्या ज्या माहिती अधिकारी आहेत त्या १९८८ ते १९८९ या कालावधीत मुख्याध्यापिका होत्या. म्हणून मागितलेली कागदपत्रे ही त्यांच्या कालावधीतील आहेत. त्यावर माहिती अधिकारी यांनी सांगितले की, नंतरच्या काळामध्ये सुध्दा अर्ज हया मुख्याध्यापिका होत्या व त्यामुळे त्यांचेकडून नंतरच्या मुख्याध्यापिकेना जो पदभार मिळालेला आहे व त्यात जी कागदपत्रे मिळाली असतील त्यातच त्यांना मिळाली असल्यामुळे त्यांनी दिनांक १३.८.२००७ रोजी तशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. अपीलकर्ती यांनी असे सांगितले की, त्या मुख्याध्यापिका असतांना सुध्दा सदरच्या कालावधीतील कागदपत्रे त्यांना मिळालेली नव्हती यावरुन हे स्पष्ट होते की, त्यांच्या नंतरही येणाऱ्या मुख्याध्यापिकेना हे कागदपत्रे

मिळणे शक्य नाही. वास्तविक अपीलकर्ती हया मुख्याध्यापिका होत्या त्यावेळेस जबाबदारी त्यांची होती व त्यांच्याकडे जर कागदपत्रे नव्हती व त्यांना सुध्दा कागदपत्रे मिळाली नाहीत असे त्यांचे म्हणणे असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे संयुक्तिक वाटते व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे सुध्दा संयुक्तिक वाटते व त्यामुळे अपीलकर्ती यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहेत असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांना त्यांच्या दिनांक १४.७.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- ९.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/११८६-११८८/९.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८७६/२००७ व अपील क्रमांक १८७७/२००७.

श्री. मधुकर विठ्ठलराव निस्ताने,
वसंतनगर, ता. घाटंजी,
जि. यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
तहसील चौक, यवतमाळ.

श्री. बोंगिरवार,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
दि यवतमाळ अर्बन को-ऑप. बँक लि.
यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ९.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री. मेत्रेवार, सहाय्यक निबंधक हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक १८७६/२००७ व अपील क्रमांक १८७७/२००७ मध्ये राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले अपील क्रमांक ५६६६/२००७ श्री. गजानन वानखेडे विरुध्द कै.पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक, अमरावती मध्ये आयोगाने दिलेला निर्णय दिनांक १९.१०.२००७ हा मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी रद्द केलेला असून नागरी सहकारी बँकांना सदरच्या अधिनियमाच्या तरतुदी लागू नसून असा निर्णय दिल्यामुळे नागरी सहकारी बँकांना सदरचा अधिनियमाच्या तरतुदी लागू होत नाहीत या कारणास्तव यवतमाळ अर्बन को-ऑप. बँकेस सुध्दा लागू होणार नाही व म्हणून सदरचे अपील हे दाखलच करुन घेता येत नसले तरी मात्र निकाली काढण्यात येते.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ९.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११८९/९.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७८/२००८.

श्री. अगस्ती लहुजी चतुर,
प्लॉट नं. ४३८, नविन सुभेदार ले आऊट,
नागपूर- ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. धिरजकुमार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. कुळमेथे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा प्रभारी भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. ज्ञापन क्र. आर.ए.ए.सी ३६६/६१, दिनांक ९.३.१९६२ व ज्ञापन क्र. आर.ए.ए.सी. ३७६/६१, दिनांक ९.३.१९६३ च्या सत्यप्रतिलिपी मिळणेबाबत. १) मौजा सोनेगांव (राजा), ता. कामठी, जि. नागपूर गावाच्या पुनर्वसनाकरिता खसरा क्र. १८/१, २, २१ क, २१ घ, २२/१ पूर्ण आराजी १०.९२ हे.आर बाबत ज्ञापन मिळणेबाबत. २) सन १९६२, १९६३. ३) तपशीलमध्ये दिलेल्या ज्ञापन क्रमांकाच्या सत्यप्रतिलिपी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार

... २

असे नमुद केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २७.३.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात आलेले दिसून येते व जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कार्यालयात बोलावून पुन्हा प्रकरण जमा केल्याची नोंद आढळून येते किंवा नाही याबाबत खात्री करुन घ्यावी. प्रकरण आढळले तर रितसर नियमानुसार रेकॉर्डरुम मधून सदर प्रकरण अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावे. परंतु जर रजिस्टरमध्ये नोंदच आढळून आली नाही याबाबत माहिती अधिकारी यांनी रितसर अपीलार्थीस या आदेशाचा संदर्भ घेऊन सत्यपरिस्थिती बाबतचा पत्रव्यवहार करावा असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही झालेली दिसून येत नाही व जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा पुढील कार्यवाही केलेली नाही. मात्र दिनांक २१.४.२००८ रोजी अपीलकर्ता यांना पुन्हा कार्यालयाने पुन्हा रेकॉर्डची पडताळणी केली परंतु संबंधित रजिष्टर एवढे जिर्ण झाले आहे की, त्यातील पानांचे तुकडे-तुकडे पडलेले आहे. त्यामुळे अपीलार्थीस म्हणजेच आपणास पाहिजे असलेल्या प्रकरणाची नोंद आढळून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ४५ वर्षापूर्वीची जुनी आहे व त्याबाबत वस्तुस्थिती जनमाहिती अधिकारी यांनी विषद केलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलाची सुनावणी घेऊन तपशीलात निर्णय दिलेला आहे व आयोगापुढे अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा ते रेकॉर्ड रुममध्ये गेले होते व त्यांना संपूर्ण रेकॉर्ड रुमची तपासणी केली व त्यामध्ये रेकॉर्ड हा व्यवस्थित नाही. तसेच संगणीकरणामुळे बरेचशे अभिलेख हलविल्याचे असे त्यांनी सांगितले व तसेच माहिती ही जुनी असल्यामुळे ती कागदपत्रे सुध्दा जिर्ण झालेली आहेत. त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध होईल किंवा नाही असे त्यांनी सांगितले आहे. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असे दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांनीच जुनी माहिती मागितलेली असल्यामुळे व त्या कागदपत्राची

वस्तुस्थिती त्यांचे निदर्शनास आणलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरच्या कार्यालयात जाऊन अभिलेखागारात त्यांना हवी असलेली कागदपत्रांची पाहणी करावी व त्यातही पुन्हा उपलब्ध झाल्यास माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसांचे आंत संबंधित अभिलेखाची माहिती घेण्याकरिता बोलाविण्यात यावे व संबंधित अभिलेखाची तपासणीस उपलब्ध करुन देण्यात यावा व माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी उपस्थित राहण्यास कळविल्यास दिलेल्या तारखेस उपस्थित राहून संबंधित अभिलेखाची तपासणी करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- १०.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/११९०-११९२/१०.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६४२/२००७.

श्री. प्रेमदास शामराव गायकवाड,
द्वारा - अनिल मेश्राम (कुलर कंपनी जवळ)
देवीनगर, टेका नाका, कामठी रोड,
नागपूर- ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. द. वि. जोशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख, जि. वर्धा.

श्री. एस. एम. धोंगडे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, समुद्रपूर,
जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.२.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.२००७ व दिनांक १७.७.२००७ रोजी अनुक्रमे अधिक्षक, भूमी अभिलेख, वर्धा व तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, समुद्रपूर, वर्धा यांच्याकडे दोन अर्ज केलेली दिसून येतात. दोन्ही अर्जामध्ये खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मौजा पिंपळगांव, मौजा नंबर २३० गिरड सर्कल, ता. समुद्रपूर(हिंगणघाट), जि. वर्धा येथील जूने शेत सर्वे नंबर १) २६६/१, ३०/२, ३१/२. २) २६६/३.

... २

३) २५३-२६५/१ क. ४) २५३-२६५/१ ख. ५) ३१/१. ६) ३१/३. ७) ३२/२ चे जुने नकाशाच्या (१९८९ पूर्वीच्या) प्रमाणित प्रती ट्रेसिंग पेपरवर मिळण्याबाबत. सदरची माहिती ही टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.७.२००७ रोजी अधिक्षक भूमी अभिलेख, वर्धा यांनी तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, समुद्रपूर यांना दिनांक ११.७.२००७ चा अर्ज हस्तांतर केलेला दिसून येतो व त्या उत्तराची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. दोन्ही अर्जाचे संदर्भात दिनांक ३१.७.२००७ रोजी अभिलेखाची पडताळणी केली असता विषयांत नमुद केलेल्या जुन्या सर्व्हे नंबरच्या सन १९८९ पूर्वीचे मुळ बंदोबस्त नकाशे (सन १८९० सालचे) कार्यालयात उपलब्ध असलेले आढळून आले. तरी आपण प्रत्यक्षरित्या कार्यालयात येऊन रितसर नक्कल फीचा भरणा करावा. त्यानंतरच कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या मुळ बंदोबस्त नकाशाच्या विषयांकित नकला त्वरित पुरविणेची तजविज ठेवण्यात येत आहे. अधिक विलंबाची जबाबदारी आपणावर राहील याची कृपया नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २७.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी नक्कल मिळणेबाबत अर्ज केला व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २७.८.२००७ रोजी नक्कल उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ५.११.२००७ रोजी पुन्हा त्यानुसार दिनांक ९.१०.२००७ ला रितसर नक्कल फी घेऊन नक्कल पुरविलेली आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. तसेच दिनांक १३.११.२००७ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना २५३-२५६/१ क व २५३-२५६/१ ख चा नकाशाची माहिती आता पर्यंत त्यांना मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर तालुका निरिक्षक भूमी अभिलेख व अधिक्षक भूमी अभिलेख यांनी असे सांगितले की, त्यांचे कार्यालयात जो नकाशा उपलब्ध आहे त्या नकाशाची नक्कल त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामध्ये फेरफार झाले असल्यामुळे त्याकरिता अपीलाचा निर्णय उपविभागीय अधिकारी यांनी दिलेला आहे व त्यातही त्यांना समाधान नसले तरी त्यांनी विभागीय आयुक्त यांचेकडे अपील

... ३

करणे आवश्यक आहे असे त्यांनी तोंडी सांगितले. परंतु त्यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे अपील केलेले आहे. अर्थात हे प्रकरण महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदी प्रमाणे करावयाचे असते व त्या अपीलामध्ये निर्णय झाल्या प्रमाणे भूमी अभिलेख यांच्याकडे दुरुस्ती केली जाते व अपीलकर्ता यांना फेरफार संबंधामध्ये दुरुस्ती करुन पाहिजे असल्यास अशा प्रकारची कार्यपध्दती त्यांनी स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती जशी आहे तशी उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे त्यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १०.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६४९/२००७.

श्री. जितेंद्र पांडूरंग जांभूळकर,
गणखैरा, ता. गोरेगांव,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. ई. दळवी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

श्री. अल्ताफ उल रहीम,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय सहाय्यक सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.२.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर यांचेकडे उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.७.२००७ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ खाली करण्यात आलेल्या नियमानुसार विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिका हा दस्ताऐवज गोपनीय स्वरुपात मोडत असल्यामुळे केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ नुसार आपण मागणी केलेल्या उपरोक्त विषयाच्या

... २

उत्तरपत्रिकेच्या/उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती आपणास देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.८.२००७ रोजी देण्यात आलेला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, विनियम, १९७७ मधील नियम क्रमांक १०४(३) नुसार विभागीय मंडळाकडून परीक्षार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिका अत्यंत गोपनीय समजल्या जात असल्याने त्यांचे पुनर्मुल्यांकन करण्याची किंवा त्या उघड करण्याची किंवा त्याची तपासणी करण्याची कोणत्याही उमेदवारास मागणी करता येणार नाही किंवा त्यास हक्क असणार नाही. त्यामुळे केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(जी) नुसार या कार्यालयाचे दृष्टिने उत्तरपत्रिका हा दस्ताऐवज गोपनीय स्वरुपाचा असल्याने मंडळ नियमाप्रमाणे आपण मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो व सदरच्या निर्णयाने सुध्दा समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीस माहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक सचिव यांनी खुलासा दाखल करुन राज्य माहिती आयोगाकडे कु. वृंदनगंगा एकनाथ बावनकर, अपील क्रमांक २७६/२००७ दिनांक ३.८.२००७ चा निर्णय दाखल केलेला असून सदरच्या निर्णयामध्ये माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे. त्यावरुन जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- १०.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/११९६-११९७/१०.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६५३/२००७.

श्री. भजोरेमना मारोती मून,
मु. पो. ता. अहेरी, चेरपल्ली रोड,
जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. एस. चाटी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, अहेरी,
जि. गडचिरोली.

श्री. जे. बी. एतावार,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रसपल्ली,
केंद्र शाळा उमानूर,
पंचायत समिती, अहेरी,
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रसपल्ली यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) सत्र २००६-२००७ वर्ग खोली २ चे बांधकामाचे इस्टीमेट पाठविल्याबाबत. २) खर्चाचा (बांधकाम) तपशील पावतीसह (छापील).

... २

३) बँकेमधून उचल केलेल्या पैशाच्या पासबुकाची नोंदीची सत्यप्रत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती ही कनिष्ठ अभियंता, गट साधन केंद्र, अहेरी यांचेकडे आहे व त्यांचेकडून घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. तसेच मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती शाळेत उपलब्ध आहे व येऊन घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे कारण माहिती पुरविली नाही असे दिलेले आहे व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा झाला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे मागितलेल्या माहितीबद्यल कोणतेही स्पष्टीकरण दाखल झाले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अभियंता, गट साधन केंद्र, अहेरी यांचेकडून माहिती घेऊन जावे असे कळविले आहे ते मोघम आहे. अभियंता, गट साधन केंद्र, अहेरी हे माहिती अधिकारी नाहीत. त्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी सदरची माहिती त्यांनी अभियंता, गट साधन केंद्र, अहेरी यांचेकडून उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. अपीलकर्ता यांच्या अर्जात माहिती व्यक्तिशः घेणार असे कळविलेले आहे. अपीलकर्ता हे अर्ज केल्यापासून ३० दिवसांच्या कालावधीत माहिती घेण्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडे गेले होते असे दिसून येत नाही किंवा ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशा प्रकारचा आक्षेप घेणारे पत्र सुध्दा दिसून येत नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी सदरचे पत्र हे दिनांक ३१.१०.२००७ रोजी मुदतीनंतर पाठविण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केले आहे असे दिसून येते व तसा खुलासा सुध्दा आयोगाकडे सही न करता दाखल करण्यात आलेला दिसून येतो. तरी अपीलकर्ता यांना सदरची माहिती संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, अहेरी यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक १ ची माहिती संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, अहेरी यांनी अभियंता, गट साधन केंद्र, अहेरी यांचेकडून उपलब्ध करुन घेऊन हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता हा निर्णय मिळाल्यापासून अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः संवर्ग विकास अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे कार्यालयीन वेळेत संपर्क साधून व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी व तशी पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- ११.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६५८/२००७, अपील क्रमांक २६५९/२००७ व अपील क्रमांक २६६०/२००७.**

श्री. अशोक बाबुराव शिरभाते,
प्लॉट नं. ७८,
मोतीलाल नगर, नवीन दिघोरी नाका,
संपदा कॉन्व्हेंटच्या बाजूला,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक,
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर.

श्री. डी. डी. तिडके,
जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक, (गृह)
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ११.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर असून त्यांचेकडून कागदपत्रे दाखल झालेली आहेत.

२. अपील क्रमांक २६५८/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून पोलीस उपअधिक्षक, (गृह) नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे

... २

माहिती मागितलेली दिसून येते. वरील संदर्भाकिंत नोटीसावरुन अर्जदाराने सोबत जोडलेल्या अर्जामध्ये मुद्या क्रमांक १ ते ११ पर्यंत माहिती मागितली आहे सदर अर्जाप्रमाणे मुद्या क्रमांक १ ते ११ पर्यंतची माहिती अर्जदारास पुरविण्यात यावी. (सोबत अर्जदाराचे दिनांक २८.८.२००७ जावक क्रमांक १४६१/०७ पो.मु.नागचे अर्जाचा दाखल जोडलेला आहे) सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २०.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.११.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयाने सुध्दा समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जाचे संदर्भामध्ये आयोगाकडे खुलासा करतांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती खोटी व दिशाभूल करणारी माहिती आहे व तसेच अपूर्ण माहिती आहे असे प्रतिज्ञा पत्रात म्हटले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा दिनांक २३.११.२००७ रोजी ११:०० वाजता अपील सुनावणीकरिता लेखी पत्रद्वारे बोलावून दिनांक २३, २४ व २६.११.२००७ रोजी दिवसभर रात्री २०:०० वाजेपर्यंत अपीलकारास ताटकळत उभा ठेवून दिनांक २६.११.२००७ रोजी २०:०० वाजता आपले कक्षात बोलावून अपीलकारास मागितलेली दस्ताऐवज कोणत्या कारणासाठी पाहिजे त्याचा खुलासा करण्यास सांगितले असता अपीलकाराने त्यांचेवर होत असलेल्या अन्यायाविरुध्द न्यायालयात सादर करण्यास कागदपत्राची आवश्यकता असल्याचे कळविल्यावर अपीलकारास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दबाव टाकून अपील मागे घेण्याबाबत नाहीतर निलंबित किंवा बडतर्फ करु असे दडपण आणले. परंतु अपीलकार आपले निर्णयावर ठाम असल्याने त्यास परत जाण्यास सांगून नंतर दिनांक २७.११.२००७ रोजी १९:०० वाजता प्रथम अपीलीय अधिकारी यांचे पत्र प्राप्त झाले. त्यात त्यांनी लेखी दिले की, अपीलकाराने केलेले आरोप तत्थहिन असल्याचे नमूद केले आहे व कलम ८(क) चा हवाला देऊन अपीलकारास माहिती देण्याचे टाळले असून अपीलकारावर प्रथम अपीलीय अधिकारी श्री. यशस्वी यादव (भा. पो. से.) यांनी अपीलकार अर्जदार याने माहिती मांगू नये या हेतुने स्वतःच्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन वारंवार दूर क्षेत्रात (पोलीस

स्टेशन नरखेड, उमरेड) २-३ महिन्याचे अंतरात बदली आदेश काढून अपीलकारास कुटुंबापासून दूर करुन अपीलकाराचे १ मुलगा (१२ वी विज्ञान शाखा) १ मुलगी इयत्ता ९ वीत शिक्षण घेत असतांना वार्षिक परीक्षा समोर असतांना अपीलकाराचे कुटुंब राहत असलेले सरकारी निवास पोलीस स्टेशन, वेलतूर येथील खाली करण्याचे आदेश ठाणेदार वेलतूर श्री. चव्हाण यांचे वतीने देऊन अपीलकाराचे विरुध्द खोटी माहिती गोळा करुन त्यास कुठेतरी अडकविण्याचा आटोकाट प्रयत्न करुन अपीलकारास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मागितलेली माहिती न देता मानसिक छळ केला असून (त्याबाबत अपीलकाराजवळ योग्य पुरावे सुध्दा आहेत) अशा प्रकारे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जाणून बुजून द्वेष बुध्दीने मागितलेली माहिती देण्याचे टाळले आहे. अशा प्रकारचा खुलासा केलेला दिसून येतो. तसेच माहिती मागण्याचे कारण आयोगास असे सांगितले की, ठाणेदार, वेलतूर श्री. चव्हाण यांच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००७ रोजी तक्रार अर्ज दिलेला होता व त्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी माहिती मागितलेली होती असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरच्या माहितीचे स्वरुप हे अधिनियमाचे कलम ८(क) प्रमाणे ग्राहय धरता येत नाही. अपीलकर्ता यांना त्यांच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली असल्यामुळे कोणत्याही प्रकारे भारताच्या सार्वभौमत्वाला किंवा एकात्मतेला, राज्याच्या सुरक्षेला, युध्दतंत्रविषयक, वैज्ञानिक किंवा आर्थिक हितसंबंधाना, परकीय राज्यांबरोबरच्या संबंधांना बाधा पोहोचेल किंवा अपराधाला चिथावणी मिळेल असे दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली संपूर्ण माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्याचे संयुक्तिक राहील व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(क) चा आधार घेतला आहे तो नियमबाहय आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा निर्णय देतांना जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे किंवा नाही याबाबतचा निर्णय न देता आरोप तथ्यहीन आहे असा निर्णय दिलेला आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी केलेल्या आरोप संदर्भामध्ये माहितीच्या संदर्भात निर्णय दिलेला दिसून येतो व ती अनियमितता आहे. त्यामुळे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक २६५९/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००७ रोजी पोलीस उपअधिक्षक, (गृह) नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

का.दा.नो.क्र.नाजिग्रा/डी-१५/कसूरी/का.दा.नो./३५/०७-१०७९६, नागपूर दिनांक १८.६.२००७ बाबतचे नोटीस. माहितीचा कालावधी १८.६.२००७ ते आजपर्यंत. वरील संदर्भाचे का.दा.नोटीस (१) पो. कॉ. १५/ अनिल आसई, (२) पो. कॉ. १२९२/सुनिल दुधपचारे, नेमणूक पो.स्टे. वेलतूर, ना.ग्रा यांना देण्यात आले आहे. त्यावरुन दोन्ही कसूरदार कर्मचाऱ्यांचे स्पष्टीकरण व आपला त्यावरुन अंतीम आदेश त्याबाबत सविस्तर माहिती (स्पष्टीकरण व अंतीम आदेशाची प्रत) मला पुरविण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.१०.२००७ रोजी मागितलेली माहिती ही अधिनियमाचे कलम ८(क) नुसार आपणांस पुरविता येवू शकत नाही असे त्यांना कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णय वरील अपीलाचे निर्णया बरोबर एकतर्फी दिलेला आहे व त्यात आपण केलेले आरोप तथ्यहीन असल्याचे नमुद केले आहे. त्यात इतर देखील कर्मचारी व अधिकारी यांची नांवे असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(त्र) नुसार माहिती नाकारण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचे निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्याबद्यल त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, दोनही कर्मचाऱ्यांचे संदर्भामध्ये त्यांना नोटीस दिला होता त्यांना त्याचप्रमाणे नोटीस दिला होता व त्यामुळे दोनही कर्मचाऱ्यांवर काय कार्यवाही केली हे जाणून घेणे आवश्यक होते म्हणून त्यांनी सदरची माहिती मागितलेली होती. त्याबाबतही जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ८(क) चा आधार घेतला आहे परंतु तो योग्य नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा निर्णय देतांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा विचार न करता अपीलकर्ता यांनी दिलेल्या तक्रारीच्या संदर्भात निर्णय दिलेला दिसून येतो व त्यातही अनियमितता आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ५

६.	अपील क्रमांक २६६०/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (गृह), नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. श्री. जे. झेड. चव्हाण, ठाणेदार, वेलतूर यांनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग करुन केलेल्या भ्रष्टाचार व मनमानी कारभार बाबत मा. पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण यांना दिनांक ६.७.२००७ रोजी आज्ञांकित कक्षात लेखी तक्रार (हस्त) अर्जदाराने दिली असून सदर तक्रारीवर कोणती कारवाई करण्यात आली त्याबाबत सविस्तर माहिती अर्जदारास नियमाप्रमाणे मुदतीचे आंत पुरविण्यात यावी ही विनंती. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे.

७.	अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांना त्यांनी दिलेल्या दिनांक ६.७.२००७ चा तक्रारीच्या संदर्भात अप्पर पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा ग्रामीण, नागपूर यांचेकडून चौकशी करण्यात आली असून सदरहू प्रकरण सध्या विचाराधीन आहे. असे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व प्रथम अपीलाचा निर्णय हा एकत्रितरित्या वरील दोनही अपीलाचा निर्णयासोबत दिलेला असून त्यात आपण केलेले आरोप तथ्यहिन असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(त्र) नुसार नाकारण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो व वास्तविक अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जात कोणत्याही प्रकारच्या चौकशीची मागणी केलेली नव्हती. झालेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती त्यांनी मागितली होती व ती उपलब्ध करुन न देता अधिनियमाचे कलमांचा आधार घेऊन नाकारण्यात आलेले आहे. तक्रारकर्ता यांच्या तक्रारीचे पुढे काय झाले व त्याप्रमाणे त्यांना विचारले होते त्या चौकशीच्या संदर्भातील छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे हे योग्य झाले असते व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा जो निर्णय दिलेला आहे तो योग्य नसून त्यात अनियमितता केलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे मागितलेली माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित असते. कोणत्याही प्रकरणातील कार्यवाही करुन मागणे किंवा कारणमिमांसा हे अपेक्षित नाही. मात्र झालेल्या कार्यवाहीची मागितलेली माहिती देणे हे अपेक्षित आहे. त्यामुळे संपूर्ण तक्रारीच्या संदर्भामध्ये चौकशी अहवाल हा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ६

## आ दे श

१) अपील क्रमांक २६५८/२००७, अपील क्रमांक २६५९/२००७ व अपील क्रमांक २६६०/२००७ हे मंजूर करण्यात येत असून त्यांची तिनही अपीलामधील दिनांक ४.१०.२००७ च्या अर्जाचे संदर्भात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे कार्यालयीन वेळेत संपर्क साधून व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- ११.२.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३/२००८.

श्री. मारोतराव विश्वनाथ मोते,
प्लॉट नं. २१, महालक्ष्मी नगर नं. १,
मानेवाडा रोड, नागपूर- ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त, (मुख्यालय)
नागपूर शहर, नागपूर.

श्री. एस.एन.मुंडेवाजीकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन)
नागपूर शहर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), नागपूर शहर, नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली श्री. गोरे हे दिनांक ७.३.२००६ पासून अर्जीत रजेवर रवाना झाले होते. त्यांच्या रजा मंजूरीच्या आदेशाची सत्यप्रत पुरविणेस विनंती आहे. २) त्याच्या EL रजेवर रवाना होण्याची व परत आल्याची तारीख व वेळ हयाबाबत माहिती मिळणेस विनंती आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांना अतिरिक्त शुल्क रुपये २/- या कार्यालयात भरणा करुन माहिती घेऊन जावी असे कळविलेले आहे. मुद्या क्रमांक २ च्या

... २

संदर्भात माहिती प्राप्त होताच कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त यांनी अपीलाची सुनावणी न घेता व अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीची कोणत्याही प्रकारचा विचार न करता अपील अर्ज परत केलेला आहे असा निर्णय दिलेला आहे. सुनावणी घेतली असती तर अपीलकर्ता यांनी त्याच वेळेस सर्व माहिती उपलब्ध झाली असती व राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्याची आवश्यकता राहिली नसती. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १३.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भामध्ये संबंधित अधिकारी हे EL रजेवर रवाना होण्याची व परत आल्याची तारीख हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत व्यक्तिशः विनामुल्य अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी त्याकरिता हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती विनामूल्य उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- १२.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/१२०७-१२०८/१२.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६६४/२००७.

श्री. ताराचंद रामचंद्र सुखदेवे,
संस्थापक सचिव, युनायडेट एज्युकेशन सोसायटी,
बोंडगांव देवी, ता. अर्जुनी मोरगांव,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वाय. एन. लंजे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव, युनायडेट एज्युकेशन सोसायटी,
द्वारा - मानवता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, बोंडगांव देवी,
ता. अर्जुनी मोरगांव, जि. गोंदिया.

श्री. एन. एस. डोंगरवार,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
मानवता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,
बोंडगांव देवी, ता. अर्जुनी मोरगांव,
जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी मानवता विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, बोंडगांव देवी यांच्याकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जामध्ये दारिद्रय रेषेखालील खालील दाखल्याची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे. परंतु आयोगाकडे कागदपत्रे दाखल करतांना

... २

प्रमाणपत्राची कोणत्याही प्रकारची प्रत दाखल केलेली नाही. माहिती अधिकारी यांनी दाखल केलेली प्रत यावर खोडतोड केलेली दिसून येते व त्यामुळे सदरच्या प्रमाणपत्राच्या संदर्भामध्ये चौकशी करणे आवश्यक आहे. त्याकरिता सदरच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत ही खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्जुनी मोरगांव, जिल्हा गोंदिया यांचेकडे चौकशी करिता पाठविणे संयुक्तिक राहील. त्याकरिता खालील प्रमाणे अंतरीम आदेश देण्यात येत आहे.

३. अपीलकर्ता अर्जदार यांच्या दिनांक १६.७.२००७ च्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाणपत्राचे संदर्भामध्ये खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्जुनी मोरगांव, जिल्हा गोंदिया यांनी चौकशी करावी व १० दिवसाचे आंत सदरचा अहवाल आयोगास सादर करण्यात यावा. सोबत प्रमाणपत्राची छायांकित प्रत व अंतरीम निर्णयाची प्रत खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्जुनी मोरगांव यांचेकडे पाठविण्यात यावी व सुनावणी दिनांक २४.४.२००९ रोजी दुपारी १.३० वाजता ठेवण्यात येत आहे.

**नागपूर**

**दिनांक :- १६.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६६६/२००७.**

श्री. ओ. प. कटयारमल,
११८/डी, पांडे ले आऊट,
खामला, नागपूर - ४४० ०२५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद.

श्री. बी. आर. देवने,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२००७ रोजी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. Copy Appointment letters on work charge/Regular temporay and orders of deem dates of the following J.E./ A.E.II १) R.D.Wadgaokar, Aurangabad, २) V.V.Choudhari, Aurangabad, ३) S.B. Dixit, Aurangabad, ४) V.C.Barade, Aurangabad, ५) G.M.Rajule, Aurangabad,

... २

६) I.A. Havanne, Aurangabad, ७) S.S.Deshmukh, Aurangabad, ८) V.G.Mathpati Aurangabad, ९) M.I.Qureshi, Aurangabad, १०) N.M.Kazi, Aurangabad, ११) S.L. Pathan, Aurangabad, सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ९.७.२००७ रोजी प्रथम अपील पुन्हा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांचेकडे दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचे संदर्भात अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नसल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.३.२००७ च्या अर्ज औरंगाबाद येथील कार्यालयास प्राप्त नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच अपीलकर्ता यांनी सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद व नांदेड यांचेकडे सुध्दा दिनांक १५.३.२००७ रोजी अर्ज केलेला दिसतो. त्या अर्जाचे संदर्भात मात्र अपीलकर्ता यांनी उत्तर आलेले आहे त्याची छायांकित प्रत त्यांनी दाखल केलेली आहे. मात्र दिनांक १५.३.२००७ चा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त नसल्याने त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. दिनांक ४.५.२००७ रोजी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी अपीलकर्ता यांना दिलेल्या पत्रामध्ये मात्र औरंगाबाद येथील कार्यालयास सत्यप्रती असा उल्लेख केलेला आहे व यावरुन दिनांक १५.३.२००७ चा अर्ज अपीलकर्ता यांनी औरंगाबाद कार्यालयास दिलेला आहे व त्यास त्यांनी आवक लिपिकाची स्विकृती आहे हेही आयोगाच्या निदर्शनास आणले व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००८ रोजी सुध्दा अर्ज केला होता व त्या अर्जाचे संदर्भामध्ये दिनांक १८.२.२००८ रोजी त्या अर्जाप्रमाणे मानीव दिनांकाचे संदर्भामध्ये माहिती शासन स्तरावरच होईल असे कळविलेले होते. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक १५.३.२००७ रोजी जी माहिती मागितलेली होती त्यावर २ मुद्यांची माहिती ही अधिक्षक अभियंता यांचे कार्यालयात उपलब्ध होऊ शकते त्या आदेशाची प्रत हे औरंगाबाद कार्यालयाकडूनच मिळू शकते व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १५.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १५.३.२००७ च्या अर्जाचे संदर्भात मागितलेली माहितीचे संदर्भात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपातच विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६६८/२००७.

श्री. डॉ. अरुणकुमार शंकरराव फालके,
मु. पो. माढेळी, ता. वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती लता साळवे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, वरोरा,
जि. चंद्रपूर.

श्री. अमित वि. रणवरे,
जनमाहिती अधिकारी तथा
पंचायत समिती, वरोरा (कृषि विभाग),
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून पंचायत समिती वरोरा यांनी ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.७.२००७ रोजी संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, वरोरा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २.९.२००७ रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन त्याच दिवशी अपीलकर्ता यांना आवश्यक असणाऱ्या प्रती पुरविले व माझे पूर्णपणे समाधान केलेले आहे असे दिनांक ३०.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी आयोगास लिहून दिलेले पत्र दिनांक १६.२.२००७ रोजी सादर केले आहे. सदर पत्रावर कोणतीही तक्रार असल्यास आम्ही जबाबदार राहू असे उपरोक्त अधिकाऱ्यांनी लिहून दिल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १६.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**
HIREKHAN/BHUJI/१२१४/१६.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६७४/२००७.

श्री. राजेंद्र प्रसाद चतुर्भुज जोशी,
श्याम साडी सेंटर, देसाईगंज,
जि. गडचिरोली - ४४१ २०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जोशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख, गडचिरोली.

श्री. विनायक ठाकरे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, देसाईगंज (वडसा),
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२००७ रोजी तालुका निरिक्षक, भूमि अभिलेख, देसाईगंज वडसा यांचेकडे अपीलकर्ता यांनी १४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः हवी आहे असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.३.२००७ रोजी विहित मुदतीत अपीलकर्ता यांना त्यांच्या १४ मुद्यांप्रमाणे मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ६.७.२००७ रोजी अपीलास हजर न होऊ शकलो त्यामुळे सुनावणी होऊ शकली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३.    अपीलकर्ता यांना दिनांक १५.३.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये युक्तिवाद करतांना असे सांगितले की त्यांनी रस्त्यांची लांबी रुंदी विचारली आहे व त्याकरिता नकाशाची प्रत घेऊन जावे असे कळविलेले आहे. त्यामध्ये नकाशा नक्कल मिळालेली नाही व त्यामुळे दिलेले उत्तर योग्य नाही. तसेच अतिक्रमणाचे संदर्भात अहवाल त्यांनी मागितलेला आहे व तो प्राप्त झाला नाही. त्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांना विचारलेले उत्तर कोणत्या प्रकारच्या रस्त्याचे किंवा भूखंडाची क्षेत्रफळ, लांबी रुंदी हे कळविणे अपेक्षित नाही. त्याकरिता उपलब्ध असलेल्या नकाशाची प्रत उपलब्ध करुन घेऊन त्यावरुन अपीलकर्ता यांनी त्यांना अपेक्षित असलेली माहिती ही उपलब्ध करुन घ्यावी. अतिक्रमण अहवालाचे संदर्भामध्ये तशा प्रकारचे अभिलेख हे नसतात परंतु अतिक्रमण झाले असेल तर त्याबाबत मोजणी करुन अहवाल तयार केला जातो व ते अहवालाचे संदर्भात पाठविण्यात येतो व त्यामुळे त्या अतिक्रमण अहवालाची नोंद मात्र कार्यालयाकडे असते. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांनी रस्त्याची लांबी रुंदी किंवा खुल्या जागेचे क्षेत्रफळ हे त्यांनी त्यांच्या अनेक अर्जातून मागितलेले आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक १५.३.२००७ रोजी प्रमाणे कळविले असल्यामुळे संबंधित खसरा नंबर नकाशाची नक्कल फी भरुन उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहील त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांना संबंधित खसरा नंबर मध्ये त्यांनी अतिक्रमण केले होते त्या अतिक्रमणाचा अहवाल उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना खसरा नंबर २२/८०/१ मध्ये झालेल्या अतिक्रमण संदर्भात येत असेल त्या जागेच्या अहवालाची प्रत तसेच नकाशाची नक्कल फी भरल्यानंतर नकाशाची छायांकित प्रत उपलब्ध करुन द्यावी. सदरची माहिती अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- १७.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/१२१५-१२१६/१७.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६७३/२००७.

श्री. श्रीहरी सदाशिव पाऊलबुधे,
राममंदीर जवळ, वार्ड नं. २,
मु. पो. ता. चामोर्शी,
जि. गडचिरोली - ४४२ ६०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जी. पी. बावस्कर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
गडचिरोली.

श्री. तुळशीराम रा. नंदनवार,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी तब्येत ठिक नसल्यामुळे दिनांक ७.२.२००९ च्या पत्रान्वये गैरहजर राहण्याकरिता विनंती केली आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००७ रोजी माहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, गडचिरोली यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मार्कंडेश्वर देवस्थान ट्रस्ट नं. ५८७ मार्कंडादेव येथील २५% गुरव कमीशन देय रुपये रक्कमची माहिती मिळण्याबाबत.

... २

माहितीचा कालावधी ५.१०.२००४ ते दिनांक १.८.२००७ पर्यंत. माहितीचे वर्णन १) देवस्थानात दिनांक १९.१.१९९६ च्या ठराव क्रमांक ४ नुसार गुरव कमीशन देत आहे. सदर २५% कमीशनात देय रक्कम रुपये दिनांक ५.१०.२००४ ते दिनांक १.८.२००७ पर्यंतची देय रक्कमेची माहिती मिळणेबाबत. २) मार्कंडेश्वर देवस्थान ट्रस्ट नं. ५८७ मार्कंडादेव यांनी दिलेले २५% गुरव कमीशनचे लाभार्थ्यांची प्रत्यक्ष लाभ घेणाऱ्यांची नावांची यादी मिळणेबाबत. ३) मार्कंडेश्वर देवस्थान ट्रस्ट नं. ५८७ यांनी २५% गुरव कमीशन वितरणांची माहिती लाभ घेणाऱ्यांच्या सहिनीशी मिळणेबाबत दिनांक ५.१०.२००४ ते दिनांक १.८.२००७ पर्यंतची माहिती द्यावी. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दिनांक ३१.३.२००३ ते दिनांक ३१.३.२००६ अखेर पर्यंत एकूण २३ पावत्या २५% गुरव कमिशन सौ. रेखा गायकवाड, गुरव पुजारी प्रतिनिधी यांना जी दिलेली आहे त्यांच्या झेरॉक्स प्रती या कार्यालयात उपलब्ध असल्याने आपणास ते पाहिजे असल्यास त्याचे प्रती पावती रुपये २/- प्रमाणे एकूण २३ पावत्यांचे एकूण रक्कम रुपये ४६/- आणि रजिष्टर ए.डी.चा खर्च रुपये ५०/- असे एकूण रुपये ९६/- सदर पत्र मिळाल्याबरोबर तात्काळ या कार्यालयास आपण भरावे म्हणजे मागितलेल्या माहितीच्या प्रती आपणास विहित मुदतीत पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.११.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते व सदरच्या निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आज द्वितीय अपीलाचे सुनावणीस अनुपस्थित राहण्याकरिता परवानगी मागितलेली आहे. सदरच्या अर्जामध्ये त्यांनी मुद्या क्रमांक २ व ३ मध्ये गुरव पुजारी यांच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या संदर्भामध्ये मुद्या उपस्थित केलेला आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही प्रकरणातील निर्णय हा गुणवत्तेच्या संदर्भामध्ये तपासणी करण्याची तरतुद नाही. "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. दस्तऐवज, अभिलेख, कागदपत्रे, टिपणी, परिपत्रके इत्यादी स्वरुपात माहिती उपलब्ध असते त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन

देणे असा "माहितीचा अधिकार" आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरच्या प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भामध्ये विचार करण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत म्हणजे दिनांक ३.१०.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे. छायांकित प्रतीच्या संदर्भात व माहिती ही नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे जो खर्च कळविण्यात आलेला आहे तो योग्य आहे. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना नोटीस अपीलकर्ता यांना नोटीस काढलेले होते असे नोटीस वरुन दिसून येते व त्यामुळे प्रत्येक वेळी अपीलकर्ता गैरहजर आहेत असे दिसून येते व अपीलाचा निर्णय हा योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे अपीलकर्ता यांच्या कोणत्याही मुद्यांचा विचार करता येणार नाही. तसेच अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा व नोंदणीकृत टपालाचा खर्च भरावा हे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी खर्च भरल्यानंतरच त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/१२१७-१२१९/१७.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २६७५/२००७ व अपील क्रमांक २६७६/२००७.

सौ. प्रमिला विरदास मून,
धानोरा रोड, रामपूर तुकूम,
जि. गडचिरोली. **..... अपीलकर्ती**

श्री. सचिव विरदास मून,
धानोरा रोड, रामपूर तुकूम,
जि. गडचिरोली. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. व्ही. जोशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख,
गडचिरोली.

श्री. जे. बी. भोयर,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती व अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००७ रोजी व दिनांक ५.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १७.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक २६७५/२००७ मध्ये अपीलकर्ती यांनी दिनांक ३०.८.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, गडचिरोली यांचेकडे एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितलेली

... २

दिसून येते. सदरची माहिती ही टपालद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.९.२००७ रोजी आपण पाठविलेल्या दिनांक ३०.८.२००७ दिनांकाच्या अर्जाच्या संदर्भात आपणाला नेमकी कोणती नक्कल पाहिजे हयांचा बोध होत नाही. तरी आपण सदरचे पत्र मिळताच तीन दिवसाचे आंत या कार्यालयात लागणारी नक्कल फीचा भरणा करुन ती प्राप्त करुन घ्यावी. अन्यथा आपण दिलेला अर्ज निकाली काढणेत येईल हयांची नोंद घ्यावी. तसेच पुन्हा दिनांक ७.९.२००७ रोजी सुध्दा पुनश्चः वारंवार तीच माहिती नमुद करुन पत्र लिहिता हे बरोबर नाही. यापुढे असे पत्र प्राप्त झाल्यास हयाची दखल घेतल्या जाणार नाही हयांची कृपया आपणाला जाणीव करुन देणेत येत आहे व आपण दिलेला संदर्भांकित पत्र क्र. १ निकाली काढणेत येत आहे. सबब आपणास कळविण्यात येत आहे. परंतु सदरच्या पत्राप्रमाणे खुलासा न करता अपीलकर्ती यांनी दिनांक १.१०.२००७ रोजी उपसंचालक, भूमि अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु दिनांक १.११.२००७ रोजी कार्यालय अधिक्षक, उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर यांनी सदरचे अपील हे अधिक्षक, भूमि अलिलेख, गडचिरोली यांचेकडे हस्तांतर केलेले आहे. त्याप्रमाणे दिनांक ८.११.२००७ रोजी शासकीय अडचण असल्यामुळे तूर्त निर्णय घेता येत नाही. असे कळवून अपीलाचा निर्णय दिलेला दिसत नाही व त्यामुळेच अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितील अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ती यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, त्यांनी पूर्वी सुध्दा अनेक अर्ज दाखल केलेली आहेत. परंतु दिनांक ३०.८.२००७ च्या अर्जाचे संदर्भात त्यांनी असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीमध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रांची माहिती मागितलेली नसल्यामुळे त्यामुळे त्यांना कोणत्या नकला पाहिजे असे विचारणा करण्यात आले होते. त्यावरुन अपीलकर्ती यांच्या अर्जातील मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ती यांनी कोणतीही कागदपत्रे मागितलेली नसून मोजणीच्या संदर्भात त्यांच्या समजूतीप्रमाणे झालेली अनियमिततेच्या संदर्भात त्यांना स्पष्टीकरण अपेक्षित आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) मध्ये "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व "माहिती" ही ज्या साहित्याचे स्वरुपात असेल उदा.:- अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, परिपत्रके, आदेश इत्यादी स्वरुपात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची छायांकित

प्रती उपलब्ध करुन घेणे असा "माहितीचा अधिकार" आहे व त्यामुळे कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांचे मत मागता येत नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे संदर्भात विचारले असता प्रथम अपीलीय अधिकारी हे अधिक्षक, भूमी अभिलेख हे आहेत. मात्र उपसंचालक, भूमी अभिलेख यांचेकडे प्रथम अपील केलेले असून सदरचे अपील हस्तांतर केलेले आहे व त्या अपीलाचे संदर्भामध्ये सुध्दा दिनांक २५.१०.२००७ रोजी जे उत्तर दिलेले आहे ते उत्तर अर्थातच अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे नाही. शासकीय अडचण असल्यामुळे तूर्त निर्णय घेता येत नाही ते बेजबाबदार पणाचे उत्तर आहे. योग्य ते उत्तर देऊन सदरचे अपील हे निकाली काढण्यात आले असते किंवा प्रथम अपीलात सुनावणी घेऊन निर्णय देता आला असता. परंतु या प्रकरणात काहीही न करता उत्तर देण्यात आलेले आहे. असे असले तरी मुळात अपीलकर्ती यांनी अर्जातून मागितलेली माहिती ही वर नमुद केल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक २६७६/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००७ रोजी एकूण ९ मुद्यांतून माहिती मागितलेली दिसून येते. परंतु ९ मुद्यांमध्ये सुध्दा त्यांनी प्रत्येक निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कारणमिमांसा विचारलेली आहे किंवा खुलासा विचारलेला आहे. परंतु सदरचा अर्ज हा अधिक्षक, भूमी अभिलेख, गडचिरोली यांचे कार्यालयात प्राप्त नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यानंतर त्यांच्याकडे हा अर्ज उपसंचालक, भूमि अभिलेख, नागपूर यांचे कार्यालयाकडून हस्तांतर करण्यात आलेला आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.९.२००७ रोजी त्यांना उत्तर देण्यात आले असून प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा त्याच प्रकारचे उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या नस्तीमध्ये दाखल केलेली कागदपत्रे व उत्तरे ती कोणत्या अर्जाचे संदर्भात आहेत त्यामुळे त्या कागदपत्राची विचारणा करण्याची आवश्यकता नाही. दिनांक ४.१०.२००७ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा दिनांक २५.१०.२००७ रोजी शासकीय अडचण असल्यामुळे तुर्त निर्णय घेता येत नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. याबाबत माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जबाबदारपणे निर्णय घेणे आवश्यक असून कनिष्ठांनी माहिती तयार करुन उत्तर देणे हे बेजबाबदारपणाचे लक्षण आहे व अधिकाऱ्यांची अकार्यक्षमता आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या अर्जात मागितलेली माहिती ही "माहिती" नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ४

**<u>आ दे श</u>**

१) अपील क्रमांक २६७५/२००७ व अपील क्रमांक २६७६/२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७८२/२००८.**

श्री. गोविंदा सोनु वलथरे,
मु. पो. पिंपळगांव (खांबी),
ता. अर्जुनी मोरगांव,
जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय,
गोंदिया.

श्री. रविंद्र खजांजी,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय,
गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपील क्रमांक १७८२/२००८ मध्ये दिनांक ४.१२.२००८ रोजी निर्णय देण्यात आला असून आदेशामध्ये "सदरच्या अपीलाच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.२.२००९ रोजी सुनावणीस राज्य माहिती आयोगाकडे हजर राहावे. अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल" अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे. त्याप्रमाणे आज

... २

जिल्हाधिकारी कार्यालयातील जनमाहिती अधिकारी हे हजर झाले आहेत. आयोगापुढे त्यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज हा त्यांनी तहसीलदार, अर्जुनी/मोरगांव यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी दिनांक १३.६.२००७ रोजी पाठविलेला आहे. परंतु निर्णयामध्ये स्पष्ट दिलेले आहे की, सदरच्या अर्जाप्रमाणे माहिती ही जिल्हाधिकारी कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनीच द्यावयाची आहे. निर्णय हा स्वयंस्पष्ट आहे. अपीलकर्ता यांचा अर्ज सुध्दा स्वयंस्पष्ट आहे. अर्जा सोबत त्यांनी उपमुख्यमंत्र्यांचे कार्यालयाचे दिनांक ५.२.२००७ ची प्रत संलग्न केलेली आहे. त्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचे पत्र दिनांक १०.१.२००७ चे संदर्भामध्ये मा.उपमुख्यमंत्री यांचे कार्यालयातील पुढील कार्यवाहीसाठी दिनांक ५.२.२००७ अन्वये जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले आहे. यावरुन सदरच्या पत्राची नोंद ही जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे कार्यालयातच असावयास पाहिजे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयास माहिती मागितलेली असल्यामुळे मा.उपमुख्यमंत्री यांचे कार्यालयातील पत्राचे संदर्भामध्ये पुढील कार्यवाही काय झाली याबद्यलची माहिती ही जिल्हाधिकारी कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी देणे आवश्यक होते. परंतु आज आयोगापुढे खुलासा करतांना मा.उपमुख्यमंत्री यांचे कार्यालयातील पत्र क्रमांक उमुस/जन/०७/५३९०, दिनांक ५.२.२००७ हे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवक नोंद वहीमध्ये नाही असे त्यांचे म्हणणे आहे व तसे असल्यास सदरच्या अपीलात त्यांचा माहितीचा अर्ज हा तहसीलदार, अर्जुनी मोरगांव यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी कोणत्या आधारावर पाठविण्यात आला याबद्यल बेजबाबदारपणा दिसून येतो. जे पत्र पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदार यांचेकडे पाठविले होते त्या पत्राबद्यल माहिती विचारली असता ती तहसीलदार यांनी उपलब्ध करुन द्यावी ही बाबच अनाकलनीय आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांच्या दिनांक ३०.५.२००७ च्या माहितीच्या अर्जाचे संदर्भामध्ये व मा.उपमुख्यमंत्री यांचे कार्यालयातील वर नमुद केलेल्या पत्राचे संदर्भामध्ये पुन्हा शोध घेऊन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. वास्तविक ही सर्वस्वी जबाबदारी जिल्हाधिकारी, गोंदिया यांची आहे व त्याकरिता जिल्हाधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्विकारली आहे असे दिसून येत नाही. सदरच्या निर्णयाची प्रत ही माहितीकरिता जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडे पाठविणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३०.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे व दिनांक ३०.३.२००७ रोजी जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडे पाठविलेले पत्र उल्लेख केलेल्या मा.उपमुख्यमंत्री यांचे कार्यालयातील पत्र दिनांक ५.२.२००७ च्या प्रमाणे कार्यवाही काय झाली ही माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना कळविण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाही व माहितीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १८.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये पुनर्विलोकन अर्ज क्रमांक ३/२००९.

श्री. एस. एल.मालवे,
समन्वय नगर, वार्ड नं. २,
ता. खामगांव, जिल्हा बुलढाणा. .....
**अर्जदार**

श्री. डी. पी. धोटे,
कॅम्प्युटर सर्कल जवळ,
राठीनगर, अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (महसूल),
ता. जळगांव (जामोद), जि. बुलढाणा.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
संग्रामपूर, जि. बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.२.२००९)**

## नि र्ण य

अपील क्रमांक १८७१/२००७ मध्ये दिनांक ८.८.२००८ रोजी निर्णय दिलेला असून आदेश क्रमांक २ मध्ये तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आहेत अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द कलम २०(१) प्रमाणे रुपये १०,०००/- शास्ती करण्यात येत असून त्यांचे दरमहाचे वेतनातून शास्तीची वसूली करुन जमा करावी व तसा अहवाल आयोगास कळवावा असा आदेश देण्यात आलेला दिसून येतो. सदरच्या आदेशा विरुध्द तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा सेवानिवृत्त नायब तहसीलदार श्री. एस. एल. मालवे यांनी पुनर्विलोकन अर्ज क्रमांक ३/२००९ दाखल केलेला आहे. सदरच्या पुनर्विलोकन अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी ज्या चौकशी अहवालाची प्रत मागितलेली होती ती चौकशीच मुळात संबंधित नायब तहसीलदार यांनी केली

... २

नव्हती व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. असे असले तरी त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ३० दिवसाचे आंत योग्य ते उत्तर देणे आवश्यक असते. चौकशी झालेली नसल्यामुळे व अहवाल उपलब्ध करुन देता येत नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे म्हणता येत नाही. कारण चौकशी ही त्रयस्थ नायब तहसीलदार यांनी करावयाची होती व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध नाही हे मात्र ३० दिवसांत कळविणे आवश्यक होते व ते कळविलेले नाही व त्याकरिता मात्र तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार हे दोषी आढळून येतात. परंतु माहिती उपलब्ध नसतांना ती उपलब्ध नाही ही बाब कळविण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द लादण्यात आलेली शास्ती रुपये १०,०००/- ही शास्ती जास्त होत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये ५००/- ची शास्ती लादणे आवश्यक होईल व त्याकरिता पुनर्विलोकन अर्ज हा मान्य करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अर्जदाराचा पुनर्विलोकन अर्ज मंजूर करण्यात येत असून अपील क्रमांक १८७१/२००७ मधील आदेश क्रमांक २ मधील रुपये १०,०००/- शास्ती ही रद्द करण्यात येऊन त्या ऐवजी रुपये ५००/- शास्ती लादण्यात येत आहे व सदरच्या शास्तीची वसूली ही संबंधित तहसीलदार, संग्रामपूर, जि. बुलढाणा यांनी करावी.

२) अर्जदार व संबंधित तहसीलदार, संग्रामपूर, जि. बुलढाणा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी निर्णयाची एक प्रत पाठविण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- १८.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/१२२७-१२२८/१८.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८/२००८.

श्री. अरविंद लखमापुरे,
अध्यक्ष, गोंदिया जिल्हा ग्राहक पंचायत,
सिव्हील लाईन, गोंदिया - ४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
नगर पालिका प्रशासन,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. आनंद श्रीवास्तव, प्रभारी प्रशासकीय अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्रीमती अमिता गोडबोले, रजा राखीव, मुख्याधिकारी हे हजर आहेत.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००७ रोजी माहिती अधिकारी, नगर परिषद, गोंदिया यांचेकडे सन १९९३-९४ पासून २००६-०७ पर्यंत गोंदिया नगरपालिकेचे थकीत असलेले मालमत्ता टॅक्स, मालमत्ता धारकांचे नावासह थकीत बाकीची वर्षवार थकीत रक्कमेची यादी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १७.१०.२००७ रोजी आपण गोंदिया शहरातील संपूर्ण मालमत्ता धारकांची यादी मागितलेली आहे. गोंदिया नगर परिषद क्षेत्रात जवळपास २५ हजार

... २

मालमत्ताधारक थकीत आहेत. शासनाच्या नियमानुसार प्रतिपेज १ मालमत्ता धारकाचा होऊन आपण दिलेले प्रपत्रात प्रत्येक मालमत्ता धारकांची विस्तृत माहिती दिल्यावर प्रतिपेज २/- रुपये प्रमाणे आपण ५०,०००/- रुपये नगर परिषद फंडात जमा केल्यास आपणांस माहिती देता येऊ शकते. तसेच आपण आपल्या आवेदनात कोणत्या मालमत्ता धारकांची थकित माहिती पाहिजे आहे त्याच्या खुलासा केलेला नाही. त्यामुळे संपूर्ण मालमत्ता धारकांची माहिती हवी असल्यास रुपये ५०,०००/- नगर परिषद फंडात रोख पाठवावे म्हणजे माहिती देण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल व सदर माहिती ६ महिन्यात संपूर्ण देण्यात येईल. असे मुख्य अधिकारी, नगरपरिषद, गोंदिया यांनी कळविलेले दिसून येते. उपरोक्त पत्राचे अनुषंगाने दिनांक २२.१०.२००७ रोजी अध्यक्ष, गोंदिया जिल्हा ग्राहक पंचायत, गोंदिया यांनी एका शिट मध्ये दिलेल्या नमुन्यात कमीत कमी ३० थकीतदारांचे नावे येऊ शकतात म्हणजेच तुमचे म्हणण्यानुसार २५,००० जरी थकबाकीदार असले तरी ८०० च्या जवळपास शिट मध्ये माहिती येऊ शकते व त्याचा प्रती शिट चार्जेस १/- प्रमाणे तेवढीच रक्कम नियमाप्रमाणे आम्हाला भरावे लागेल. आपण ५०,००० भरविण्यास कळविले आहे हे आपणास माहिती द्यावयाचे नसून तो हेतुपूर्वक कायद्याविरुध्द रचलेला षडयंत्र आहे व तो चुकीचा असून माहिती अधिकाराच्या अंतर्गत शक्तीचा परिक्षेत्रात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २०.११.२००७ रोजी आपणास नावाने पेज निहाय सुची निहाय थकीत मालमत्ता मालकाची सुचीची गरज असल्यास १ पेज मध्ये किमान ३० नावांप्रमाणे प्रतिपेज रुपये २/- प्रमाणे २६० रुपये भरुन आपणास माहिती उपलब्ध करुन देता येईल. कृपया तीन दिवसात प्रत्यक्ष कर अधिक्षक कार्यालयाशी संपर्क साधावे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी सदरची रक्कम दिनांक ३०.११.२००७ रोजी भरणा केलेले दिसून येते व त्याच वेळेस अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पूर्वी दिनांक १६.११.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त, नगरप्रशासन, नागपूर यांचेकडे अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.१२.२००७ रोजी देण्यात आलेला असून दिनांक ३.१२.२००७ रोजी मागणी केलेली माहिती पुरविण्यात आली असल्यामुळे तसेच पुरविण्यात आलेली माहिती चुकीची असल्याबाबत कुठलाही सबळ पुरावा अपीलकर्ता यांनी सुनावणी दरम्यान सादर केला नाही. अपीलार्थीस माहितीच्या खरे खोटेपणा बद्यल पडताळणी करावयाची असल्यास त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज करुन नगरपरिषदेतील मूळ अभिलेखांचे निरिक्षण करावे. असा निर्णय देऊन निकाली काढण्यात आलेले दिसून येते.

राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलात सुध्दा माहिती चुकीची व दिशाभूल करणारी दिलेली आहे व अपूर्ण दिलेली आहे. त्यात श्री.लक्ष्मीनारायण अग्रवाल, वार्ड नं. ३९, कमलाबाई मेठी, रेल्वे वार्ड २४, विष्णुकुमार तिवारी, रेल्वे वार्ड ३९ यांचे बद्यलची माहिती दिलेली नाही असे अपील मेमोत दिलेले असले तरी लक्ष्मीनारायण अग्रवाल, कमलाबाई मेठी व विष्णुकुमार तिवारी बद्यल उल्लेख दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांनी सुध्दा मागितलेली माहिती ही योग्यरित्या तपासून पाहिलेली दिसून येते व त्यामुळेच त्यांना माहितीची आवश्यकता आहे किंवा नाही हा संशय उत्पन्न होतो. कमलाबाई मेठी, गीता अग्रवाल, विजयकुमार धुळे, हरिश्चंद्र लालवाणी, सिंधू भोजवाणी, कमलबेन पटेल यांसंदर्भातील थकबाकीची माहिती ही जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी तपासून घेऊन अपीलकर्ता यांना सत्यस्थिती कळविणे संयुक्तिक राहील. कोणत्याही प्रकारे अपीलामध्ये अपूर्ण, दिशाभूल करणारी किंवा चुकीची माहिती दिली असे नमुद केलेले असल्यास त्याकरिता पुरावा देणे आवश्यक असते व तसा पुरावा दिलेला नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी मात्र ती तपासून वर नमुद केल्याप्रमाणे पाठविणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून कमलाबाई मेठी, गीता अग्रवाल, विजय धुळे, हरिश्चंद्र लालवाणी, सिंधू भोजवाणी, कमलबेन पटेल मालमत्ता धारकांच्या संदर्भामध्ये माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत व्यक्तिशः विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून विनामूल्य माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- २०.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/१२२९-१२३१/२०.२.२००९

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२/२००८.

श्री. राम वासुदेवराव घुई,
जुने हिस्लॉप कॉलेजच्या मागे,
टिळक रोड, महाल, नागपूर - २. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
उमरेड, जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
कुही, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. शेख, कनिष्ठ लिपीक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. सचिन गोसावी, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००६ रोजी राजस्व माहिती अधिकारी म्हणून तहसीलदार, कुही यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. गावे खलासना, ता. कुही येथील नवीन खसरा क्र. ११९ येथील जमीन वडिलोपार्जित ७/१२ नुसार मधुसूदन, राम, सुरेश, प्रमिलाबाई घुई हयांचे नांवे हक्क लेखाद्वारे कमी केले. तो हक्क लेख तसेच १.७१ जमिनीपैकी ६४ कुंठे जमीन श्री. हसनअली खुरशद अली हयांना विकलेल्या विक्रीपत्राची प्रत व हक्क लेखाची प्रत मिळण्याबाबत. हक्क लेखद्वारे नांव कमी केले फेरफार क्रमांक ३०, दिनांक ४.९.१९९२. हसनअली खुरशद अली हयांना ४.३.१९९३ विक्री केलेले रुपये ३८,०००/- विक्रीपत्र. सदरची माहिती टपालाद्वारे पाठवावी सोबत ३५/- चा पोस्टेज मुद्रांक सहित लिफाफा

... २

पाठविण्यात आला आहे असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १.७.२००६ रोजी देण्यात आलेला आहे. प्रथम अपीलाचे निर्णयाने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने तहसीलदार, कुही यांनी तलाठी सा.क्र. १, मौजा खलासना यांना दिनांक ३.२.२००६ रोजी पत्र पाठविलेले दिसून येते. त्याप्रमाणे तलाठी यांनी दिनांक १७.२.२००६ रोजी तहसीलदार, कुही यांना अर्जदारास सब रजिष्ट्रार कार्यालयाकडून वरील विक्रीपत्राची प्रमाणित प्रत मिळू शकते अशी माहिती दिली. तसेच अर्जदारास दिनांक १४.२.२००६ आणि दिनांक १६.२.२००६ रोजी परस्पर कागदपत्रे पुरविलेली आहेत व त्याप्रमाणे दिनांक २९.४.२००६ रोजी तहसीलदार, कुही यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना जरी माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी अपीलकर्ता यांची मागणी विक्रीपत्राची आहे व फेरफार कशाचे आधारे घेतला अशी मागणी आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही कागदपत्राचे स्वरुपात छायांकित प्रतीत मिळते. कोणत्याही प्रकारच्या निर्णय प्रक्रियेच्या हस्तक्षेप करण्याची तरतुद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्या माहितीच्या आधारे त्यांना महाराष्ट्र जमिन महसूल १९६६ प्रमाणे उपविभागीय अधिकारी, उमरेड यांचेकडे अपील दाखल करणे संयुक्तिक राहील व त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- २०.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/१२३२-१२३३/२०.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६/२००८.**

श्री. भिमराव गुणजी वानखेडे,
प्लॉट नं. २९, नविन सुभेदार ले आऊट,
ठवरे कॉलोनी, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती इंदूमती परतेकी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. लांजेवार,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१०.२००७ रोजी राज्य शासकीय माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांना ऑक्टोंबर, २००७ मध्ये मान्यता प्रदान करण्यात आलेल्या मान्यता पत्राच्या व जावक रजिस्टरच्या झेरॉक्त प्रती मिळणेबाबत माहिती मागितलेली होती. सदरची माहिती अपीलकर्ता यांना दिनांक २०.२.२००९ रोजी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे लेखी लिहून दिलेले आहे की, मला माहिती मिळालेली आहे. आता माझे काहीही म्हणणे नाही. तरी कृपया सुनावणी रद्य करावी अशी विनंती केल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २०.२.२००९** **नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/१२३४/२०.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६/२००८.**

श्री. वामन नारायणराव निर्मल,
श्रीनगर ले आऊट, बॅचलर रोड,
वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अशोक ठाकरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा.

श्री. अनिल कोपूलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी (सा. प्र. वि.)
जिल्हा परिषद, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२००७ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे सेवा विषयक १९९४ ते २००३ या कालावधीतील जोडण्यात आलेल्या सहपत्राप्रमाणे एकूण ३० मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरचे प्रथम अपील उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना कनिष्ठ अधिकाऱ्यांकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय उपलब्ध झाला नाही म्हणून राज्य माहिती

... २

आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये मुदतीत मागितलेली माहिती उपलब्ध न करुन दिल्याबाबत असे कारण दिलेले आहे. अपील मेमोमध्ये माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सा.प्र. वि., जि. प. वर्धा अर्जात मात्र जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा असे म्हटले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना स्वतःच असे सांगितले की, माहितीच्या अर्जाचे संदर्भामध्ये त्यांना कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार मिळाला नाही. व्यक्तिशः माहिती घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे त्यांना माहिती बद्यल विचारले होते. परंतु कोणाला विचारले त्याबद्यलचा पुरावा नाही. विहित मुदतीत माहिती सुध्दा नाही. याबद्यलचा पुरावा नाही. परंतु त्यांनी मागितलेली माहितीचे स्पष्टीकरण मागितले होंते व त्यातही स्पष्टीकरण दिलेले नाही. मात्र प्रतिज्ञापत्र दाखल करुन मी सादर केलेली द्वितीय अपील ही सत्य असतांना देखील मला मी मागितलेली माहिती हि मोघम स्वरुपाची आहे असे असमाधानकारक उत्तर देऊन मला जाणून बुजून हेतुपुरस्करपणे माहिती पुरविली नाही असे प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.९.२००७ व दिनांक ८.१०.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने वरील संदर्भीय अर्ज क्रमांक १ व २ अन्वये आपण प्रश्न विचारले आहेत. त्याअनुषंगाने अनुक्रमांक १३ अन्वये १९९६ ची निवड यादीची प्रत मागणी केली आहे. तसेच मानघोडे व मानमोडे यांचे सीआर पुरविण्यात येत आहे. तसेच जोडपत्रातील प्रश्नाची माहिती उपलब्ध नाही. तरी आपण या कार्यालयात रुपये ५७/- चा भरणा रोखपाल सा. प्र. वि. यांचेकडे जमा करावे. तसेच आपण स्वतःहा उपस्थित राहून उपलब्ध रेकॉर्डची मागणी करावी. असे तत्कालीन माहिती अधिकारी श्री. अे. डी. कोपुलवार, यांनी कळविलेले दिसून येते. सदरचे पत्र उपलब्ध झाले नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. परंतु कार्यालयाचे जावक नोंद वहीमध्ये ३२४० या क्रमांकावर पत्र पाठविण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आलेली दिसून येत नाही. सुनावणीची नोटशिट दाखल केलेली आहे. सुनावणी मध्ये अपीलकर्ता अर्जदाराने मोघम प्रश्नाचा खुलासा केल्यानंतर तात्काळ अर्जदारास माहिती पुरवावी. माहिती प्राप्त करण्याकरिता रुपये ५७/- भरण्याबाबत माहिती अधिकाऱ्यांचे दिनांक ३.११.२००७ रोजी पत्र पाठविल्याचे दिसून येते असा उल्लेख केलेला दिसून येतो. तसे अपीलकर्ता सुध्दा हजर होते. त्या

संदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००७ रोजी पत्राने कळविण्यात आले आहे. परंतु तेही पत्र अपीलकर्ता यांना मिळालेले नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्याबाबत संपूर्ण जावक नोंदवहीचे निरीक्षण केले असता अनुक्रमांक ३४१७ वर यु.पी.सीने अपीलकर्ता यांना पत्र पाठविलेले आहे व त्याबाबत पुरावा आयोगाकडे दाखल करण्यात आलेला आहे व त्यामुळे दोनही पत्रे अपीलकर्ता यांना पाठविलेली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या प्रकरणामध्ये योग्य ती कार्यवाही केलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी जे प्रश्न विचारलेली आहेत ते प्रश्न हे अभिप्रायात्मक प्रश्न आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या आहे. त्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याचे स्वरुपात उदा.:- कागदपत्रे, टिपणी, निर्णय, दस्तऐवज, इत्यादीच्या स्वरुपात उपलब्ध असलेली कागदपत्राच्या छायांकित प्रती घेणे असा "माहितीचा अधिकार" ची व्याख्या आहे. कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये प्रश्न अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे बहुतांश प्रश्न हे अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे नाही. मात्र ज्या प्रश्नातून कागदपत्र उपलब्ध करुन देणे असे दिसून येईल त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक असते. परंतु त्याही बाबत अपीलकर्ता यांनी स्पष्टीकरण दिलेले नाही व मागितलेल्या माहितीच्या तारखेत खर्चाचा भरणा सुध्दा केलेला नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या खर्चाचा भरणा केल्यास व स्पष्टीकरण दिल्यास कागदपत्राच्या स्वरुपात त्यांना माहिती उपलबध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत खर्चाचा भरणा कळविलेला असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी स्पष्टीकरण दिलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/१२३५-१२३७/२१.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २३/२००८.**

श्री. के. यु. भोयर,
मुख्य प्रवर्तक,
भारत गृहनिर्माण सहकारी मागासवर्गीय संस्था
नियोजित (मर्या.), शिवनगर, खामला, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (महसूल)
नागपूर.

श्री. एस. एन. चौधरी,
जनमाहिती अधिकारी तथा
चिटणीस (महसूल शाखा)
आयुक्त कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या अपील मेमो सोबत दिनांक २६.६.२००७ व दिनांक १०.७.२००७ रोजी केलेल्या माहितीच्या अर्जाचे संदर्भातील छायांकित प्रती दाखल केलेली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले असे त्यांनी सांगितले. परंतु प्रथम अपील मेमोचा दिनांक ८.९.२००७ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २८.९.२००७ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेली दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये विभागीय आयुक्त कार्यालय भ्रष्टाचार विरोधक समिति, आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. क्र./कावि/०४/

... २

०७/४/०७/६, दिनांक २२.६.२००७ मौजा खामलाच्या ख.नं. ६७ ची जाच होनेकरिता अर्ज एम महिन्याचे आंत. ना. सु.प्रन्यास अधिक्षक अभियंता ने विषयांकित भुखंडाचा कब्जा म.न.पा.मध्ये विपक्षीचे नेता नाना शामकुळेला देण्यासाठी तोडूदस्ताने संस्थेची चौकी आणि बोर्डला जमीन दोष केले आणि नझुल अधिकारी ने शासकीय पदाचा दुरुपयोग करुन सन १९९१ ला केलेली संस्थेंचा अर्ज सन २००२ ची सांगून निवासी उपजिल्हाधिकारी कडून संस्थेची अर्ज नस्तीबध्द केले आणि इतर सन १९९८, १९९९ व २००० चे अर्जदाराचे प्राधिकरणाला आधीचे म्हणून त्यांनी मंजूर केले यांची जाच करुन संस्थेला न्याय आणि भ्रष्ट अधिकारी यांनी शिक्षा मिळणेची माहिती पाहिजे. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. तसेच दिनांक १०.७.२००७ च्या अर्जामध्ये चिटणीस तथा माहिती अधिकारी उपआयुक्त महसूल शाखा, आयुक्त कार्यालय, नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक ६.४.२००७ रोजी दिलेल्या अर्जावर कार्यवाही बाबत. एक महिनाचा आत. नागपूर सुधार प्रन्यास, अधिक्षक अभियंता व नझंल अधिकारीने इतर अर्जदाराला यांचा आधीचे प्राधिकरण म्हणून सन १९९८, १९९९, २००० चे अर्ज मंजूर केले आणि संस्थेची सन १९९१ ची अर्जाला सन २००२ ची प्राधिकरण सांगून अर्ज नस्तीबध्द केला व निवासी उपजिल्हाधिकारीने ७/१२ अनुसार जंगल झुडपी म्हणून सादर होण्याचे विचाराधीन आहे. आपण निराकर करावे आणि शासनद्वारा सोमलवार सोसायटीला दिले प्रमाणे शिल्लक भूखंड संस्थेला बहाल करणेची कृपा करावी. सदरची माहिती स्पिड पोष्टने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.७.२००७ रोजी सहाय्यक माहिती अधिकारी महसूल शाखा, आयुक्त कार्यालय, नागपूर यांनी दिनांक ६.४.२००७ रोजीचा तक्रार अर्ज हा चौकशी तथा अहवालाकरिता सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे समितीच्या निर्देशानुसार पाठवून अहवाल मागविण्यांत येत आहे असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक २१.८.२००७ रोजीच्या अर्जाचे संदर्भामध्ये त्याच प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये सुध्दा दिनांक २१.८.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे या कारणास्तव सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००७ किंवा दिनांक २१.८.२००७ रोजीच्या संदर्भात झालेली माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी त्यांच्या दिनांक ६.४.२००७ च्या अर्जाचे बाबत सखोल चौकशी

होऊन कार्यवाही करावयाची दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अर्जाप्रमाणे अशा प्रकारची कोणतीही चौकशी करणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

५. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे समितीचा निरिक्षण अहवाल मागितलेला आहे असे कळविलेले आहे. त्याबाबत सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे दिनांक ६.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे झालेली कार्यवाहीची माहिती ही अपीलकर्ता यांना त्यांस नागपूर सुधार प्रन्यास हे स्वतंत्र प्राधिकरण असल्यामुळे त्यांची मागणी संयुक्तिक राहील.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२/२००८.

श्री. लिलाधर भूरा बोपचे,
रा. डव्वा (सटवा) पो. कारंजा,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोरेगांव, जि. गोंदिया.

श्री. ए.सी.राहांगडाले,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत डव्वा (सटवा)
पो. कारंजा, ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री. पी. एफ. बन्सोड, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००७ रोजी सरपंच/सचिव, ग्राम पंचायत डव्वा, पंचायत समिती, गोरेगांव यांचेकडे घर क्रमांक २५७ संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. वरील माझे नावे असलेल्या घर क्रमांक २५७ चे खालील जागेचे नमुना ८ प्रमाणपत्र ग्राम पंचायत कार्यालयाकडून माहितीच्या अधिकारानुसार मिळण्यात यावे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २६.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व प्रथम अपीलात सुध्दा निर्णय

... २

झालेला नसल्याने अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता आज गैरहजर आहेत. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, जरी अर्जाप्रमाणे झाल्याची स्विकृती झाली असली तरी त्यांचे कार्यालयात अर्ज नाही व स्विकृतीवर जनमाहिती अधिकारी यांची सही करुन स्विकृती सारखी सही असली तरी त्यांची सही नाही. तसेच जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. श्री. लिलाधर भुरा बोपचे यांनी माहितीच्या अर्जामध्ये त्यांचे घर क्रमांक २५७ च्या खालील जागेच्या नमुना ८ ची माहिती मागवितलेली आहे. तथापी माहिती अर्ज कार्यालयात प्राप्त झालेला नाही अर्जदारानी ग्रामपंचायत कार्यालयात याच विषयाबाबत साधा अर्ज दाखिल केला होता. अर्जदार व त्यांचे काका यांच्यात जमीनीबाबत वाद असून ते प्रकरण न्यायालयात सादर केले आहे. न्यायालयाचा निर्णय लागेपर्यंत त्यांचा जमीनीचे मोजमाप करण्यात येऊ नये असा ठराव ग्रामपंचायत कमिटीने मंजूर केलेला आहे. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २९.९.२००७ रोजी ग्राम पंचायत समिती यांचेकडे आला होता त्याबद्यल त्यांना कळविण्यात आले आहे. तसेच अपीलकर्ता यांच्या घराचा वाद असल्यामुळे ग्रामपंचायतने ठराव सुध्दा घेतला आहे व त्या ठरावाची प्रत जोडलेली आहे यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. यापूर्वी त्यांनी अनेक अर्ज केले होते व त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना वादाचा पूर्ण कल्पना आहे. ग्रामपंचायत कमेटी प्रत्यक्षात मौकावर वादाचा निर्णय झाला असता त्यांच्याकडे आले होते त्याचप्रमाणे ग्रामपंचायतने ठराव सुध्दा केलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण कल्पना असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- २१.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/१२४१-१२४२/२१.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१/२००८.**

श्री. युवराज मुरलीधर येनप्रेडीवार,
वार्ड नं. ३, ता. देवरी, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री. आर्य चाणक्य ग्राम विकास संस्था
कट्टीपार, द्वारा - छत्रपती विद्यालय, सितेपार,
ता. आमगांव, जि. गोंदिया.

श्री. मधुकर शा. पटले,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
छत्रपती विद्यालय, सितेपार,
ता. आमगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.२.२००९ रोजी घेण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी मागितलेली माहिती अपीलकर्ता यांना दिनांक २१.९.२००९ रोजी उपलब्ध झाली असल्यामुळे मागितलेल्या माहिती विषयी माझे समाधान झाले. त्यामुळे मला मागितलेल्या माहितीची आवश्यकता वाटत नाही असा फॅक्स अपीलकर्ता यांनी या कार्यालयास पाठविलेला आहे व माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती विद्यालय, सितेपार यांनी सदर प्रकरणी कोणतीही तक्रार उदभवल्यास आम्ही जबाबदार राहू असे लेखी कळविले असल्यामुळे व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील खारील करण्यात येत आहे.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- २१.२.२००९**
HIREKHAN/BHUJI/१२४३/२१.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २९/२००८.**

श्री. भास्कर मिठुजी डोंगरे,
कस्तुरबा वार्ड, पंचशील झेंडयाजवळ,
ता. जि. गोंदिया-४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती ममता झा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, (माध्यमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. एम.एम.बारस्कर,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. Dr. Ambedkar Vidyalaya, Suryatola Rd. Gondia. Certified Xerox copies of appointment orders, approval letters accoded or refusal of appointment proposals, w.s.submitted to the Presiding Officer School tribunal, Chandrapur in case No. १७/२००६ in respect of Vivek M.Rokde, peon by E.O.(Sec.)Z.P.Gondia approval letters issued in the session २००७-२००८ or prior to ७.२००८, from your official

record. January २००३ to October, २००७. सदरची माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ७.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २०.१२.२००७ रोजी संस्थेचे अपीलीय अधिकारी तथा सचिव, दिशाभूमी शिक्षण संस्था, वरठी यांच्याकडे माहिती विहित मुदतीत अर्जदारास माहिती पुरविण्यासाठी पाठविण्यात आले असून अपील निकाली काढण्यात आलेले आहे असे दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२००७ च्या अर्जात जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये दिनांक २.११.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी श्री. व्ही. एम. रोकडे, परिचर यांचे मान्यता संबंधी कागदपत्र व श्री. एन. डी. भौतिक, निलंबित मुख्याध्यापक यांचे अपील क्रमांक १७/२००६ संबंधित कागदपत्र मिळण्याबाबत अर्ज माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. संदर्भीय पत्र क्रमांक २ अन्वये खाजगी शाळेचे मुख्याध्यापक माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी संस्थेचे पदाधिकाऱ्यांपैकी एक असतो असे कळविण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २३.११.२००७ व दिनांक १५.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना पत्र पाठविलेले दिसून येते. त्यानुसार दिनांक २०.१२.२००७ रोजी संस्थेचे अपीलीय अधिकारी तथा सचिव यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास पत्र पाठविलेले दिसून येते. दिनांक ४.१२.२००७ रोजी मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना श्री. व्ही. एम. रोकडे, परिचर यांचेबाबतची माहिती १ ते ७ प्रपत्रान्वये सोबत जोडून पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांच्या अर्जात मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जात मागितलेली माहिती ही संस्थेकडे सुध्दा आहे. तसेच त्यांच्या संस्थेच्या कार्यालयात सुध्दा आहे त्यामुळे संस्थेकडून माहिती घेण्यात यावी असे त्यांना कळविले होते. त्याबाबत शाळेचे मुख्याध्यापक यांच्याकडे माहिती आहे व त्यांनी उपस्थित असतांना सांगितले. तसेच शाळा न्यायाधिकरणाकडे शिक्षणाधिकारी यांनी दाखल केलेल्या लेखी खुलाश्याच्या प्रती माहिती अधिकारी यांच्याकडे

... ३

आहेत. यावरुन मागितलेली माहिती ही दोन जनमाहिती अधिकारी यांची आहे असे दिसून येते व त्यामुळे संस्थेचे मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध झाली ती त्यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच उपशिक्षणाधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध असेल ती त्यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २७.९.२००७ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती ही उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे उपलब्ध असेल ती त्यांनी माहिती अधिकारी म्हणून हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना व्यक्तिशः विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच जी माहिती मुख्याध्यापक, दिक्षाभूमी शिक्षण संस्था, वरठी यांचेकडे उपलब्ध असेल ती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना व्यक्तिशः विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी सदरची माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन घेण्याकरिता जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) तसेच जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ.आंबेडकर विद्यालय, सुर्याटोला, गोंदिया यांचेकडे व्यक्तिशः हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत व्यक्तिशः संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**दिनांक :- २४.२.२००९**

HIREKHAN/BHUJI/१२४४-१२४६/२४.२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३१/२००८.**

श्री. नागोराव दशरथजी ठाकरे,
मकान नं. ३८२, मु. वाघोडा, (गुजरखेडी),
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
नगरपालिका प्रशासन विभाग,
आयुक्त कार्यालय, नागपूर.

श्री. विनोद जाधव,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, सावनेर,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सावनेर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माझे मकान ग्रामीण भागात असून मालमत्ता करासाठी ते ग्रामीण भागातून (वाघोडा-गुजरखेडी) येथून शहरी भागात (नगरपरिषद सावनेर) येथे कोणत्या दिनांकापासून स्थानांतरीत झाले आणि राज्य शासनाचे कोणत्या आदेशान्वये झाले याची माहिती मला पाहिजे

आहे. त्याचप्रमाणे स्थानांतरीत झाल्याबद्यल शासनाचे आदेशाची राजपत्रित प्रत पुरविण्यात यावी ही मागणी आहे वरील मागितलेली माहिती लेखी स्वरुपात माझे पत्त्यावर लवकर पाठविण्यात यावी असे नमुद केलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २४.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या एकूण ६० प्रतीचे रुपये २/- प्रती प्रत प्रमाणे रुपये १२०/- चा भरणा नगरपरिषद फंडात करुन छायांकित प्रती या कार्यालयातून घेऊन जाव्या असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यावर दिनांक १५.५.२००७ रोजी आपण दिलेल्या पत्रामध्ये मी मागितलेल्या माहितीचा कोणताच उलगडा होत नाही. मला कोणत्याही ६० प्रतींची आवश्यकता नसून मला फक्त जोडपत्र-अ नियम ३(१) या अर्जामध्ये कॉलम ३ मध्ये नमुद केलेली आवश्यक माहिती तपशीलासह पाहिजे आहे. ती आपण पुरवावी ही अपेक्षा आहे. त्याप्रमाणे दिनांक ३१.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना आपले घर सावनेर विकास आराखडयानुसार नगर परिषद हद्यीतच येत असल्यामुळे आपणावर कराची आकारणी केलेली आहे. याबाबत विस्तृत माहिती आवश्यक असल्यास आपले घर ज्या ले-आऊट मध्ये असेल त्याचा नविन व जुना ख.क्र. कळवावा व आवश्यक माहिती घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर दिनांक २६.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी माझे मकान मालमत्ता करासाठी ग्रामीण भागातून (वाघोडा-गुजरवाडी) येथून शहरी भागात (नगरपरिषद सावनेर) येथे कोणत्या तारखेपासून स्थानांतरीत झाले व राज्य शासनाचे कोणत्या आदेशान्वये झाले या मुद्यांवर स्पष्टपणे माहिती देऊन शासनाच्या आदेशाची राजपत्रित प्रत पुरवावी असे कळविलेले आहे व त्यानंतर दिनांक ७.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २१.९.२००७ रोजी दिलेला असून अपीलकर्ता व प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तसेच प्रकरणातील संबंधित कागदपत्राचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, अपीलकर्त्यास माहिती पुरविल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचे संदर्भामध्ये मुख्याधिकारी, नगरपरिषद, सावनेर यांनी आयोगाकडे खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. १) श्री. नागोराव दशरथ ठाकरे यांनी दिनांक १६.४.२००७ ला माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज सादर करुन नगरपरिषद हद्यीबाबत माहिती मागितली त्यानुसार त्यांना आवश्यक माहिती शुल्क रुपये १२०/- जमा करुन घेऊन जाण्याबाबत कार्यालयीन पत्र क्र. ५३२, दिनांक २४.४.२००७ अन्वये पत्र देण्यांत आले. परंतु त्यांनी ते शुल्क जमा न करता दिनांक १५.५.२००७ चे पत्रान्वये (आवश्यक तिकीट लावलेली नाही) मला ६० प्रतीची आवश्यकता नाही असे

कळविले यावर या कार्यालयाचे पत्र क्र. ४५३, दिनांक ३१.५.२००७ अन्वये त्यांचे रहाते घर नगरपरिषद हद्दीतच असल्यामुळे आपणांवर कराची आकारणी करण्यांत आल्याचे कळविण्यांत आले. यावर त्यांनी पुन्हा दिनांक २२.६.२००७ चे पत्रान्वये (आवश्यक तिकीट लावलेली नाही) मला माझे मकान ग्रामीण भागातून शहरी भागात केव्हा स्थानांतरीत करण्यांत आले याबाबत माहिती मागितली त्यानुसार त्यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ४८२, दिनांक २.७.२००७ अन्वये आपण आपले घर ज्या ले आऊट मध्ये आहे त्याचा ख.क्र. व ले आऊटचे नांव कळविण्याचे सांगण्यात आले. जेणे करुन सावनेर विकास आराखडयात अवलोकन करुन आपले घर नेमके कोणत्या हद्यीत आहे हे कळविणे सोईस्कर होईल असे सुचविण्यांत आले हे पत्र ते घरी न भेटल्यामुळे चष्मा करण्यांत आलेले आहे. २) या संपूर्ण पत्रांचे व्यवस्थित उत्तर न देता अर्जदाराने मा.उपआयुक्त, अपील अधिकारी, नगरपालिका प्रशासन, नागपूर यांचेकडे अपील केलीया अपीलाची सुनावणी दिनांक १३.९.२००७ ला झाली ज्यामध्ये नगर परिषदेने आपले संपूर्ण दस्ताऐवजांसह कार्यालयीन पत्र क्र. ५०५, दिनांक ३१.८.२००७ अन्वये आपली बाजू मांडली यावर मा.उपआयुक्तांनी सुचविल्यानुसार त्यांना पुन्हा या कार्यालयाचे पत्र क्र. १०८१ दिनांक ४.९.२००७ अन्वये पुन्हा एकदा आपणांस आवश्यक असलेली माहिती शुल्क जमा करुन घेऊन जाण्यास कळविण्यांत आले त्यानुसार त्यांनी दिनांक ७.९.२००७ ला या कार्यालयाशी संपर्क साधून १९६१ च्या आदेशाची प्रत घेऊन गेले व नकाश्याची प्रत नंतर घेऊन जाण्याबाबत लिहून दिले आहे व तसा अहवाल या कार्यालयाचे पत्र क्र. क्यु, दिनांक २१.९.२००७ अन्वये या कार्यालयाद्वारे मा.उपआयुक्त यांना सादर करण्यांत आलेला आहे. त्यानुसार मा.उपआयुक्त यांचे आदेश क्र. प्रकरण क्रमांक ७/२००७-२००८, दिनांक २१.९.२००७ अन्वये प्रकरण निकाली काढण्यांत आलेले आहे. अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत मागितलेली माहितीचे करिता खर्चाचा भरणा करण्यात आलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनीच खर्चाचा भरणाचे संदर्भामध्ये कागदपत्राचे स्वरुपामध्ये माहिती नको असे सांगितले असल्यामुळे नंतर ती माहिती उपलब्ध झालेली आहे ती माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. द्वितीय अपील मेमोमध्ये मागितलेली माहिती कायद्याद्वारे निर्धारण कालावधीमध्ये मिळाली नसल्यामुळे तसेच सुस्पष्ट माहिती मागितलेली अजून पर्यंत मिळाली नसल्यामुळे असे कारण दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध होण्यास ते सुध्दा कारणीभूत आहेत व कोणती माहिती हवी व कोणती नको अशा प्रकारचे पत्र दिलेले असल्यामुळे त्यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती योग्य आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ४

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २४.२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**नागपूर विभाग, नागपूर**

HIREKHAN/BHUJI/१२४७-१२५०/२४.२.२००९